




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १५८ * नांदेड * रविवार, दि. १४ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# भारतीय हवाई दलाचं विमान आसाममध्ये कोसळलं, ५ जवानांना वीरमरण

**गुवाहाटी (प्रतिनिधी)–** आसामच्या जोरहाट एअरबेसवर भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाला. एअरबेसवर लँडिंग करत असताना हवाई दलाचं एएन-३२ कार्गो विमान क्रॅश झालं. या घटनेत विमानाचे दोन तुकडे आहेत. या दुर्घटनेत भारतीय हवाई दलाच्या ५ जवानांना वीरमरण आलं. या घटनेत या विमानातील को-पायलट बचावले आहेत, मात्र त्यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. भारतीय हवाई दलाकडून तातडीनं या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

स्क्वाड्रन लीडर प्रशांत सिंह, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जेंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर वायू खेमाराम कुमावत, अग्निवीर वायू दानिश आलम या पाच भारतीय हवाई दलाच्या वीरमरण आले आहे.

भारतीय हवाई दलानं प्रसिद्धीस दिलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकात या दुर्घटनेत वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. या दु:खाच्या प्रसंगात भारतीय हवाई दल तुमच्या कुटुंबासोबत उभे असल्याचे



देखील सांगण्यात आले आहे.

भारतीय हवाई दलानं या घटनेचं गांभीर्य लक्षात घेता भारतीय हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी सुरु केली आहे. ही दुर्घटना कोणत्या कारणामुळं झाली याची चौकशी करण्यात येईल. जोरहाट एअरबेस जवळ विमान कशामुळं क्रॅश झालं. तांत्रिक समस्या निर्माण झाली की इंजिन फेल झालं याची चौकशी केली जाईल. याशिवाय खराब हवामानामुळं हा अपघात घडला असावा का या बाजूनं देखील चौकशी केली जाईल. भारतीय हवाई दलानं कोर्ट ऑफ इनक्वायरीचे आदेश दिले आहेत. या अपघातात को पायलट बचावला असून या चौकशीत त्याची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कारण तो अपघातावेळी कॉकपिटमध्ये होता.

भारतीय हवाई दलात एएन-३२ विमान गेल्या चार दशकांपासून महत्त्वाची भूमिका पार पाडतंय. कारगील युद्धापासून बचावकार्य राबवण्यामध्ये या विमानाची महत्त्वाची भूमिका होता. यापूर्वी देखील हे विमान क्रॅश झालं आहे. भारताच्या गरजा लक्षात घेऊन रशियाकडून एंतोनोव डिझाईन ब्यूरोकडून तयार करण्यात आलं आहे.

## लेफ्टनंट जनरल धीरज सेठ नवे लष्करप्रमुख



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** लेफ्टनंट जनरल धीरज सेठ आता देशाचे नवे 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ' अर्थात लष्करप्रमुख असणार आहेत. राष्ट्रपतींच्या अनुमतीने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची ३० जून पासून चीफ ऑफ आर्मी स्टाफपदी नियुक्ती करण्यात येत आहे. व्हाईस जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडून ते पदभार स्वीकारतील, असे संरक्षण मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

लेफ्टनंट सेठी सध्या व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ पदावर कार्यरत आहेत. यंदा एप्रिल महिन्यात त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. लेफ्टनंट सेठ हे पुण्याजवळच्या खडकवासला इथल्या नॅशनल डिफेन्स अकादमीचे विद्यार्थी आहेत. डिसेंबर १९८६ मध्ये ते लष्करात रुजू होते.

# भारतीय जहाजांवरील हल्ल्यांसाठी अमेरिकेने इराणला धरलं जबाबदार

**तेहरान (वृत्तसंस्था)–** अमेरिका आणि इराणमधील युद्धाबाबत तीन महिन्यानंतर देखील ठोस तोडगा निघालेला नाही. या युद्धाचा परिणाम होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या आणि येणाऱ्या जहाजांवर होत असून याचा फटका अनेक देशांच्या जागतिक व्यापाराला बसत आहे. इराणवर भीषण हल्ला करण्याची धमकी देणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी काही तासांतच यू-टर्न घेतला. इराणबरोबर शांतता करारासंबधित सकारात्मक चर्चा झाल्याचा दावा करत इराणवरील नियोजित हवाई हल्ले रद्द केल्याची घोषणा त्यांनी गुरुवारी रात्री केली.

अमेरिका आणि इराणमधील या घडामोडी दरम्यान गेल्या चार दिवसांत अमेरिकेच्या लष्कराने ओमान किनारपट्टीजवळ अनेक जहाजांवर हल्ले केले. या हल्ल्यात आतापर्यंत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. या घटनेचा भारत सरकारने निषेध करत अमेरिकेच्या उप-राजदूतांना समन्स बजावले होते. तसेच अमेरिकेच्या यूएस सेंट्रल कमांडने भारतीय जहाजांवरील हल्ल्याची कबुली देखील दिली होती. मात्र, असं असतानाही आता डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय जहाजांवरील हल्ल्यांसाठी इराणला जबाबदार धरलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून डोनाल्ड ट्रम्प हे इराणवर चांगलेच भडकले आहेत. भारतीय जहाजांवरील ड्रोन हल्ले अस्वीकार्य असल्याचं म्हणत डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय जहाजांवरील हल्ल्यांसाठी इराण जबाबदार असल्याचा दावा केला आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांनी शांतता कराराबाबत केलेल्या दाव्यानंतर इराणने हा दावा आधी फेटाळून लावला होता. तसेच या करारातील काही अटींबाबत माध्यमांमध्ये बातम्याही आल्या होत्या. यावरून डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला चांगलंच सुनावलं आहे. इराणनं युद्धसमाप्तीसंदर्भातील ज्या काही अटी बाहेर जाहीर केल्या आहेत, त्यांचा प्रत्यक्ष करारात दोन्ही बाजूंनी मान्य केलेल्या अटींशी काहीही संबंध नाही. जो करार झाल्याचं निरर्थक विधान त्यांनी केलं आहे, त्याचा वास्तवाशी संबंध नाही. ही माणसं चर्चा करण्यासाठी अत्यंत अयोग्य आहेत. चांगल्या वातावरणात त्यांच्याशी चर्चा होऊच शकत नाही, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

शिवाय, काल रात्री 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'मधून जाणाऱ्या भारतीय जहाजांवर त्यांनी केलेला ड्रोन हल्ला पूर्णपणे हाणून पाडण्यात आला. अशा कारवाया अजिबात स्वीकारार्ह नाहीत. त्यांनी (इराणने) आपली वागणूक त्वरित सुधारली पाहिजे, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

# पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन दोन दिवस बंद राहणार

**पंढरपूर (प्रतिनिधी)–** पंढरपुरचे विठ्ठल मंदिर २३ आणि २४ जून रोजी विठ्ठल मंदिर सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. भाविकांनी हे दोन दिवस पंढरपूरला येऊ नये, असे आवाहन मंदीर प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

झिजत असलेल्या विठ्ठल मूर्तीची झीज रोखण्यासाठी अखेर २३ ते २४ जून दरम्यान पुरातत्व विभागाकडून विठ्ठल मूर्तीवर लेपन प्रक्रिया होणार असून २३ आणि २४ जून रोजी विठ्ठल मंदिर सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. २२ जून ते २४ जून दरम्यान रासायनिक पद्धतीनेच हे लेपन होणार असून पुरातत्व विभाग नियमानुसार विठ्ठल मूर्तीवर लेपन करणार आहे. त्यामुळे २३ व २४ जून रोजी विठ्ठल मंदिर पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. विठ्ठल मूर्तीच्या पायाला एक खड्डा पडला असून इतर ठिकाणीही मूर्तीवर मोठ्या प्रमाणात झीज झाल्याचे समोर आल्यानंतर आता याच पद्धतीच्या दगडाची पावडर ऑरगॅनिक रसायनात मिसळून मूर्तीच्या झिजलेल्या भागावर लावली जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्र तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

# आ. रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा दुसरा दिवस



**पंढरपूर (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे उपोषण सुरू केले. या उपोषणाचा शनिवारी दुसरा दिवस होता.

राज्य सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' सुरूच राहील, असा इशाराही रोहित पवार यांनी दिला. त्यांच्या या उपोषणाला आता काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दर्शवला असून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हेदेखील पंढरपुरात जाऊन उपोषणाला बसणार आहे. खुद्द सपकाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्या संदर्भातील घोषणा केली आहे.

भाजपा आणि महायुती सरकारवर टीका करताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून जाचक अटींमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी करून सात-बारा कोरा करा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरु केलेल्या उपोषणाला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा आहे. त्यांनी केलेल्या मागण्या रास्त आहेत, त्या सरकारने तात्काळ मान्य करायला हव्यात. रोहित पवार यांच्या उपोषणस्थळी जाऊन मी सुद्धा उपोषण करणार आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते माजी आमदार अनंत गाडगीळ हे देखील उपस्थित होते.

# एकनाथ शिंदे ज्या दिवशी ठरवतील त्या दिवशी ऑपरेशन टायगर पूर्ण होणार

## केंद्रीय मंत्री प्रताप जाधव यांचा दावा

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेनेचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ज्या दिवशी योग्य वेळ आणि मुहूर्त ठरवतील, त्या दिवशी हे ऑपरेशन टायगर पूर्ण होईल, असा दावा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाचे काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा वारंवार पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर आता शिवसेनेचे नेते तथा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी एक मोठा दावा केला आहे. ऑपरेशन टायगर आता अंतिम टप्प्यात पोहोचले असून ते पूर्णत्वाकडे गेले आहे. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे ज्या दिवशी योग्य वेळ आणि मुहूर्त ठरवतील, त्या दिवशी हे ऑपरेशन पूर्ण होईल, अशी माहिती प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. त्यांच्या या विधानामुळे ठाकरे गटात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.

# एसबीआय बँकेतील सोने तारण घोटाळ्यात अडकलेल्या मुख्य आरोपीचा राजस्थानमध्ये मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील डॉक्टर लेन भागात असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (एसबीआय) शाखेत उघडकीस आलेल्या सुमारे ८५ लाख रुपयांच्या ठेवीदारांच्या सोनेतारण घोटाळ्यातील मुख्य आरोपी तथा बँकेचा रोकड व्यवस्थापक आदित्य प्रकाश सेनगावकर याचा राजस्थानातील भरतपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेला वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी दुजोरा दिला आहे.



वजिराबाद पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यात आदित्य सेनगावकर आणि कर्मचारी जीवन माधवराव जगदाळे यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला होता. बँकेत तारण ठेवलेल्या अस्सल सोन्याची चोरी करुन त्या ठिकाणी बनावट सोने ठेवून दोघांनी संगनमताने सुमारे ८५ लाख रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. हा गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर बँकेच्या मुख्य व्यवस्थापकांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

गुन्हा दाखल होताच जीवन जगदाळे याच्यासह अन्य दोघांना पोलिसांनी अटक केली. मात्र आदित्य सेनगावकर हा गुन्हा नोंदविण्यापूर्वीच नांदेडमधून बेपत्ता झाला होता. त्याच्या पत्नीनेही त्याच्या बेपत्ता असल्याची तक्रार वजिराबाद पोलिसांकडे दिली होती. त्यानंतर स्थानिक पोलिसांनी त्याचा शोध घेण्यासाठी विविध राज्यांमध्ये तपास सुरू ठेवला होता.

दरम्यान, आदित्य सेनगावकर राजस्थानातील भरतपूर येथे असल्याची माहिती समोर आली. तेथे त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे.

या घोटाळ्याचा तपास अद्याप सुरू असून मुख्य आरोपीच्या मृत्यूमुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले आहे. पोलिसांकडून आता उपलब्ध पुराव्यांच्या आधारे उर्वरित आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याची तयारी सुरू असतानाच या वृत्तामुळे प्रकरणाला वेगळी दिशा मिळाली आहे.

# पंतप्रधान मोदींचा १२ वर्षांचा कार्यकाळ म्हणजे 'विश्वास, विकास आणि सुशासनाचा' सुवर्णकाळ- खा. चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशाचे नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षांचा कार्यकाळ हा आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीकडे ठोस पावले उचलणारा तसेच विश्वास, विकास, जनकल्याण आणि सुशासन व सुप्रशासनाचा काळ ठरल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपपूर्तीनिमित्त भाजपा नांदेड महानगर कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपा महानगराध्यक्ष, माजी आ. अमरनाथ राजूरकर, माजी मंत्री डी. पी. सावंत, भाजप प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू




देशमुख, जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे, ॲड. किशोर देशमुख, निलेश देशमुख बारडकर, प्रवीण साले, विजय येवनकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी खा. अशोकराव चव्हाण यांनी केंद्र सरकारच्या कामगिरीचा आढावा घेताना सांगितले की, तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर पंतप्रधान मोदींनी सर्वप्रथम 'पीएम किसान सन्मान निधी'च्या फाईलवर स्वाक्षरी करून शेतकऱ्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले. या योजनेद्वारे ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात थेट ४.३ लाख कोटी रुपये जमा झाले आहेत. तसेच, 'डीबीटी' प्रणालीमुळे लाखो बनावट लाभार्थी हटवून देशाच्या तिजोरीची ४.३१ लाख कोटी रुपयांची बचत झाली आहे. २०१४ ते २०२६ या काळात देशातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे १.४६ लाख किलोमीटरवर पोहोचले असून, दररोज ३४ किमी वेगाने महामार्ग बांधले जात आहेत. रेल्वेचे ९९.६ टक्के विद्युतीकरण पूर्ण झाले असून नांदेड-मुंबईसह देशात १६४ वंदे भारत एक्सप्रेस धावत आहेत. नागरी विमान वाहतुकीत अभूतपूर्व प्रगती झाली असून, 'उड्डाण' योजनेमुळे नांदेडसारख्या शहरातून आज ८ प्रमुख शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध झाली आहे.

भारताच्या सीमा आणि अंतर्गत सुरक्षा अत्यंत मजबूत झाल्या असून, सर्जिकल स्ट्राईकसारख्या चोख प्रत्युत्तर देणारा हा नवा देणारा भारत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातून सिद्ध झाले आहे. नक्षलवादाचा पाडाव करून 'रेड कॉरिकॉर'चे रूपांतर आता (पान ६ वर...)



# नांदेड पोलीस आयुक्तालयाबाबत पुन्हा मुख्यमंत्र्यांना भेटणार

- आयुक्तालयासंदर्भात लातूर मध्यम मार्ग काढण्यासाठी तयार
- खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडला मंजूर झालेल्या महसूल आयुक्तालयावरून लातूरसोबत वाद झाला होता. परंतु आता मध्यंतरी लातूरचे काही आमदार मला भेटले असून आयुक्तालयासाठी मध्यम मार्ग काढण्याची त्यांची तयारी असल्याचे सांगितले, अशी माहिती खासदार अशोकराव चव्हाण यांनी दिली. दरम्यान नांदेड येथील पोलीस आयुक्तालयाबाबत आचारसंहिता संपल्यानंतर पुन्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात देशात झालेल्या विकासकामांची माहिती देण्यासाठी खासदार अशोकराव चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधला.

महाराष्ट्राच्या नकाशात नांदेड हे प्रमुख शहर म्हणून पुढे येताना आगामी काळात दिसेल. नांदेडचा महसूल आयुक्तालयासंदर्भात लातूरचे आमदार भेटले असून लवकरच मधला मार्ग काढण्यात येईल. तर पोलिस आयुक्तालयासंदर्भात विधान परिषदेची आचारसंहिता संपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून चर्चा करणार असल्याचेही चव्हाण म्हणाले.

## सदृश्य आणि अदृश्य शक्ती पाठीमागे

विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार असलेल्या अमरनाथ राजूरकर यांचा एकतर्फी विजय होईल यात काही शंकाच नाही. कारण सदृश्य आणि अदृश्य शक्ती आमच्या पाठीमागे आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महायुतीतील घटक पक्षाचे नेते असल्यामुळे त्यांची भेट घेतली होती. सध्या उन्हाळी सुट्ट्या असल्यामुळे काही नगरसेवक कुटूंबासह सहलीवर गेले असतील, ते लवकरच परत येतील, असेही चव्हाण म्हणाले.

# रेल्वे डब्याला आग लावण्याच्या घटनेचा १५ दिवसांनी उलगडा; आरोपी अटकेत

## आग लावल्याचा संशय

**नांदेड (प्रतिनिधी)–** रेल्वे डब्याला आग लावण्याच्या घटनेतील आरोपीला अटक करण्यात आली असून आरोपीला १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. आरोपीने रेल्वे डब्याला आग लावल्याचा संशय आहे.

हिंगोली रेल्वे स्थानकाच्या फ्लॅट क्रमांक १ वर दि. २७ मे रोजी गाडी क्रमांक १७६४२ (नरखेडकाचेगुडा इंटरसिटी एक्सप्रेस) आगमन झाल्यानंतर डबा क्रमांक एससी-२५९२८८ (डी-५) मधील शौचालयातून धूर निघत असल्याचे निदर्शनास आले. आरपीएफचे कॉन्स्टेबल व्ही. एम. शिंदे यांच्या सतर्कतेमुळे व तत्पर कारवाईमुळे अग्निशामक यंत्राच्या सहाय्याने आग तात्काळ विझविण्यात आली व संभाव्य मोठी दुर्घटना टळली. या प्रकरणी रेल्वे अधिनियम, १९८९ च्या कलम १५३ अंतर्गत आरपीएफ पोस्ट, पूर्णा येथे गुन्हा नोंदवून सखोल तपास सुरू करण्यात आला. विविध रेल्वे स्थानकांवरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली, न्यायवैज्ञानिक (फॉरेन्सिक) सहाय्य घेण्यात आले.

सातत्यपूर्ण तपास, तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही पडताळणी, गुप्त माहिती संकलन आणि क्षेत्रीय चौकशीच्या आधारे विशेष तपास पथकाने अवघ्या १५ दिवसांत या प्रकरणाचा यशस्वी उलगडा केला. दि. ११ जून २०२६ रोजी आरोपी मंगेश जाधव (वय २९ वर्षे), जि. वाशीम (महाराष्ट्र) यास ओळख पटवून अटक करण्यात आली. तपासादरम्यान आरोपीचा रेल्वे डब्याच्या शौचालयात आग लावण्याच्या घटनेशी थेट संबंध असल्याचे पुरेसे पुरावे आढळून आले. आरोपीस दि. ११ जून २०२६ रोजी पूर्णा येथील लोहमार्ग न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून न्यायालयाने त्यास १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# पायाचा फोड चंद्राचा तुकडा



पाच वर्षाखाली मुंबई शहरातल्या नामांकित कॉलेजचं कवीसंमेलन होतं. त्या कार्यक्रमाला निमंत्रित कवी म्हणून गेलो होतो. तिथे कार्यक्रमाचं एकदम सुंदर नियोजन केलं होतं. बसायला मऊमऊ गाद्या, बिस्लरीचं पाणी. उन्हाळा असल्याने थंड एसीची हवा. त्यात ऐकायला बसलेली वीस ते पंचवीस वयातली तरूण मुलं-मुली होती. सभागृह पूर्ण खचाखच भरलेलं होतं. सत्कारसंमारंभ झाला. कुणी कशावर तर कुणी कशावर एकेकांच्या कविता सादर झाल्या. शेवटी माझी बारी आली. मी आपलं थरथर कापत डायसजवळ गेलो. कारण एवढ्या मोठ्या कार्यक्रमात सहभागी कधीही झालो नव्हतो. म्हणून जरा धाकधुक असल्याने घसा कोरडा पडला होता. घोटभर पाणी पिलो. कविता कोणती सादर करायची ती अगोदरच निवड केली होती. शेती, माती, शेतकरी, आणि शेतकऱ्यांच्या मुलांच्या अवस्थेविषयी कविता होती.

जगाला अन्न देणारा
रोज राहतो उपाशी
लग्न करण्यास मुलगी
तयार होईना मुलांशी.

अशी कविता सादर केलो. माझ्या कवितेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. कारण सगळे विद्यार्थी बंगल्यात राहणारे होते. मंच सोडला तर प्रेक्षकांमधून फक्त एकाच मुलीने टाळी वाजवीत दाद दिली होती. तरीही नाराज झालो नाही. कारण शहरात जाऊन ग्रामीण मांडावं हा विचार पक्का होता. तशी दाद देतील न देतील याची आधीच अपेक्षा ठेवलो नव्हतो. असो. राहून राहून मला त्या मुलीचं आश्चर्य वाटत होतं. तीही माझ्याकडे अधूनमधून पाहत होती. मीही अधूनमधून तिच्याकडे पाहत होतो. नियोजित कार्यक्रम संपला.

आम्ही मान्यवर एकमेकांना भेटून सभागृहाच्या बाहेर पडलो. तेवढ्यात ती मुलगी आली अन म्हणाली काका, तुमची पोयम ना मला खूप आवडली. व्हेरी नाईस...मला ना शेती खूप आवडते, पण काय करू आमच्याकडे शेतीच नाही. मी आपलं स्मित हास्य चेहऱ्यावर आणत बाळा तुझं नाव काय?

मानसी. अरे व्वा! छान नाव आहे. थ्यँक्यू काका. मग आमच्या थोड्यावेळ गप्पा झाल्या. गप्पा मारत असतानाच म्हणालो, तू लग्न करशील तेव्हा शेतकरी मुलासोबतच कर म्हणजे आपोआप शेती येईल तुझ्याकडे. नाही का? चालेल ना..? हो. काका नक्की सांगेन... हो खरंच तुझ्या मम्मी-पप्पांना तसं सांग शेतकऱ्यांच्या घरी लग्न करून द्या म्हणून... असं म्हणताच ती गालात हसली आणि माझ्या मनातलं बोललं काका तुम्ही असं म्हणाली. ते ऐकून मलाही बरं वाटलं. तिथे तिने माझा नंबर घेतला आणि मीही तिचा नंबर घेऊन आम्ही एकमेकांचा निरोप घेतलो. अधूनमधून ती मानसी फोन करायची... ग्रामीण भाषेवर, ग्रामीण भागावर भाष्य करणारी कविता ऐकवा म्हणायची...मीही तितक्याच उल्हासाने तिला कविता ऐकवायचो...तीही मुलगी पुन्हा दाद द्यायची... अशाप्रकारे एक वर्षे गेलं...पुन्हा एके दिवशी फोन आला आणि म्हणाली, हॅलोऽऽ काका, हाऊ आर यू? काय म्हणालीस बाळा, कसे आहात?

मी खुशाल आहे, तुझच सांग...तू कशी आहेस..? असे विचारून पुढे बोलत बोलत बऱ्याच गप्पा झाल्या, आणि म्हणाली, माझ्यासाठी ना तुम्हीच शेतकरी मुलगा बघा.. मी शेतकऱ्याशी लग्न करायला तयार आहे. माझं शिक्षण पूर्ण झालेलं आहे. फक्त त्याची इच्छा राहावी की, कदाचित मला जॉब लागला तर करू देण्याची. नाही म्हणजे तशी मनसिकता झाली पाहिजे. नक्की प्रयत्न करतो. पण तू नाजूक मुलगी, तुला शेतातलं काम होईल का? असा प्रश्न करून तीच्या मनाचा ठाव घेतला अन् न राहून मलाच वाटू लागलं की, तिलाच सुन केलं तर..? ती शहरात राहिलेली...लाडात वाढलेली... नखाला सुद्धा मळ लागत नाही... धुनीभांडी करायला नौकर. स्वयंपाक करायलाही नौकर असताना ग्रामीण भागाची ओढ लागलेली.

तिच्याशी संवाद करता करता ती मुलगी जिद्दी स्वभावाची होती हे जाणवलं. तिच्याजवळ मायाळूपणा...तिचं गोड रूप. तिचा गोरा रंग. शब्दात तिच्या गोडवा होता. डोळे एकदम ठळक... धारदार तीक्ष्ण नाकाची. लांब लांब डोळ्यांच्या पापण्या. अशी सुंदर रूपवान देखणी मुलगी एकंदरीत ती दिसायला खूप सुंदर होती. मी म्हटलं, माझाच मुलगा आहे. चालेल का? ती थोडी थपकली. एखाक्ळ भोवरा दोरीतून निसटावा अन् गर्रऽऽ गर्रऽऽ जमिनीवर फिरावा तशी विचारात गुरफटून गेली अन् थोड्यावेळाने विचारायला लागली. मुलगा तुमचा काय करतो? त्याचे शिक्षण? मुलाचेही शिक्षण पूर्ण झाले आहे. तोही देखणा आहे... सुंदर आहे...एकंदरीत तुमच्या दोघांची जोडी राजा-राणी-सारखी सोभेल...हे ऐकून ती थोडीशी लाजली.. थोडी हसली... मग फोन ठेवला. काही दिवसांनी पुन्हा फोन केला, बाळा, विचार केलास का? हो काका केला मी विचार. तेवढ्यात माझ्या मुलाचे फोटो तिकडे पाठवून झाले होते. कार्यक्रमस्थळी काढलेला मुलीचा फोटो होताच माझ्याकडे. मग मीही घरी मुलाला त्या मुलीचा फोटो दाखवला आणि म्हणालो, राघव, तुझ्यासाठी मुलगी सुंदर आहे.. तुला न विचारताच तीची निवड तुझ्यासाठी केली आहे. तुझं मत काय आहे? हे मला नंतर कळव... हा घे मोबाईलमधला फोटो तू बघ आणि तुझ्या आईलाही दाखव.

मोबाईल मधला फोटो मुलाने पाहताच थोडा हसला. त्याला ती मुलगी आवडली. त्याच्याकडे पाहून मला विश्वास आला. तसा राघव आई-बाबांच्या आज्ञेत राहणारा होता. त्याने बाबाला होकार दिला. अशावेळी कोणाच्याही बाबाची छाती फुगून वर येते तशी माझीही छाती फुगून वर आली. त्याही मुलीने तिच्या मॉम-डॅडना समजावून सांगितलं. तिच्या वडिलांनी एके दिवशी माझ्याशी संपर्क केला आणि म्हणाले, हॅलो ऽऽ हाऊ आर यु? राम राम पाहुणंऽऽ कसे आहात? तेव्हा न पाहिलेले होणारे इवाई म्हणाले, बरे आहोत. आमच्या मुलीला तुमच्या घरची सुन म्हणून स्वीकार करावा असा आमचा मानस आहे अन् आमची मानसीही तुमच्या घरी येण्यास तयार आहे.

चांगले आहे की... मीच तुम्हांला एकेदिवशी फोन करणार होतो, तेवढ्यात तुमचाच फोन आला बरं झालं...ख्यालीखुशाली विचारून मग घरच्या महिलांनीही एकमेकींना बोलून घेतले. एकंदरीत माहोल आनंदीत झाला होता. एके दिवशी रितसर कार्यक्रम ठरला. साखरपुडाही झाला. तारीख काढून पाहुण्यांना पत्रिकाही पाठवल्या गेल्या. शहरी पाहुणे येणार म्हटल्यावर धाकधूक वाढूनच होती. नाहीतर काही कमी पडले तर अहो पाटील सर, असे कसे पाहुणे तुमचे..? आमची गैरसोय झाली तुमच्या प्रोग्राममध्ये. असं म्हणून फसगत व्हायला नको म्हणून चोख तयारी करून निवांत झालो होतो. अपेक्षेप्रमाणे लग्नाला पाहुणेमंडळीही खूप जमले होते. लग्नाचं ठिकाण नांदेड ठरवलं होतं त्यामुळे आम्हांला जास्त काही अडचण आली नव्हती. एकदम आनंदात लग्नही लागले. गोड पदार्थ म्हणून प्रसंगात बुंदी, जिलेबी, बेसनवडा होता. गोड पदार्थात साखर आमच्याप्रमाणे बरी होती. पण शहरी सोयऱ्यांना जास्त गोड जमणार नाही याची कल्पना मात्र आम्हांला कोणालाच नव्हती. गोड पदार्थ खाऊन झाल्यावर एका सोयऱ्याने विषय काढलाच संतोष जवळ. संतोष म्हणजे कामळज गावचा अडीअडचणीत साथ देणारा तरूण मित्र. योगायोग संतोष मुंबईच्या सोयऱ्याजवळ उभा होता. त्याच्याकडे पाहून म्हणाले, ओ पाहुणं! वरमुलाकडचेच ना? हो बोला ना काका, काय झालं? मोतीचूरमध्ये शुगर कमी ठेवायचं असतं ना.. माफी असावी काका, सांभाळून घ्या. अशी विनंती करून संतोषने गोड झालेलं प्रकरण मिटवलं. कोणी नाराज व्हायला नको म्हणून लग्नात नातेवाईकांना शोधून शोधून फोटोही काढून घेतले. साड्या-दांड्या झाल्या. आजवर होती आमची, आता झाली तुमची! म्हणून डोक्यावर पापडं फोडले... ठरलेल्या वेळेप्रमाणे सगळे तिकडचे सोयरे मुंबईला वापस गेले. मुलगी मुलासोबत गावाकडे आली. लग्नानंतर नवरीला पाहिल्याबिगर आमच्या गावातलं एकही पिल्लू राहिलं नाही. चार दिवसांत देवधर्म करून झाले. त्यांच्या वैवाहिक जीवनाची सुरुवात झाली. खरं तर लग्न झालंकीच तिथून पुढे तिच्या आयुष्याची खरी सुरुवात झाली होती.. कारण तिचा नवरा हा शेतकरी होता. ती पुढे हळूहळू शेतातलं सगळं जाणून घ्यायची. ऐकून घ्यायची. समजून घ्यायची. प्रत्येक झाडाबद्दल विचारून घ्यायची. प्रत्येक फुलांबद्दल विचारून घ्यायची. एके दिवशी गहू निंदायला शेतात चार बायका आल्या होत्या. मी आधीच शेतावर गेलो होतो. माझ्या मागे चार बायांना घेऊन माझी बायको आली. मुलाला एका कंपनीला ऑनलाईन मुलाखत द्यायची असल्याने तो घरीच होता. मुलाखतीत मुलगा पास होऊन तो इंजिनियर झाला. त्याला नौकरी लागली...सुन आणि मुलगा आनंदीत झाले. तेवढ्यात दुपारची वेळ झाली होती. नौकरी लागलेली गोड बातमी आमच्यापर्यंत येऊन मुलाला सांगायची घाई झाली होती. घाई घाईने दुपारचं जेवण घेऊन मुलगा राघव नवीन नवरी मानसीला घेऊन शेतावर आला. डोक्यावर भाकरीची दुरडी घेऊन घराच्या बाहेर निघाल्यानंतर शेजारच्या बायांची कुजबूज चालू झाली. काशिनाथ पाटलाच्या ढाळजच्या वट्यावर बसलेली शकूबाई म्हणाली, काय माय बाई, बगा की जी कोवळ्या पोरीला शेताला काढलय...आंगाची हाळदबी अजून निघाली न्हाय... तर काढले खुरपायला. काय लय गरज हुती काय माय?

असं म्हणताच दळण निसत समोरच्या वट्यावर बसलेली नंदाबाई म्हणाली, करपून टाकतात बघ चार दिसातच पोरीला, व्हय जी बाईऽऽ शारवस्तीतली पोरगी तघ धरीन काय? काय व्हते की माय? दोन बायकांच्या उत्साहाला ऐकत ऐकत नवीन नवरी मानसी पुढे सरकत गेली. शेतावर आली. शकूबाईची आणि नंदाबाईची चालू असलेली चर्चा मानसीने सासूबाईला सांगू लागली.. दुपारच्या जेवणाची वेळ झाली असल्याने निंदायला आलेल्या बायकांना बोलावून आंब्याच्या झाडाखाली आम्ही सगळे हातावर भाकरी घेऊन खायाला सुरूवात केलो. इकडे मानसीला असं हातावर भाकर घेऊन खाणे पहिल्यांदाच आम्ही पाहत होतो. तशी तिनेही थोडी लाजली होती. तरीही हातावर भाकर घेऊन भाकरीवर मुगाची दाळ टाकून केलेली पालकंची भाजी घेऊन खाऊ लागली. शेतातलीच हिरव्यागार मेथीचे शेंडे, कांद्याची पात घेऊन जेवण करू लागलो. आम्हांला पाहून मानसीनेही तसच खायला सुरूवात केली.

बाजूलाच बसलेल्या बाया मानसीकडे निरखून पाहू लागल्या होत्या. शहरातली असल्याने टेबलावर बसून जेवायची सवय असलेली पोरगी शेतकरी नवरा केल्यामुळे असं ढेकळात बसून हातावर भाकरी घेऊन आमच्यात मिसळून जाणे खरतर शहरातल्या मुलीसाठी खूप अवघड गोष्ट. म्हणून त्या बायांना नवल वाटू लागलं. कुतूहलाने बघू लागल्या, आणि मला म्हणाल्या, काय बी म्हणा बघा, सून मातर लय देखनी केल्या नजर लागावी अशी... तेवढ्यात माझी मालकीण म्हणाली. आलाय तसा योग जुळुन... देवच कराताकरविता हाय सगळं. आपल्या हाती काय? असेल दोघांचे नशीब एकत्र नांदायचे हो की नाही. अशा गप्पा करत जेवण झालं... पुन्हा आम्ही संमदे ज्याचं त्याच्या कामाला लागलो. मानसीला वाटलं आपणही बघावं निंदून कसं असते ते म्हणून सुनेने हातात इळा घेतला. पात धरून निंदायला चालू केली. केशरी रंगाच्या साडीवर पांढरा शुभ्र गोऱ्या रंगाचा बायकोचा चेहरा, हिरव्यागार गव्हामध्ये शोभून दिसत होता. म्हणून राघव मानसीकडे एकटक डोळे लावून तिच्याकडे बघत असताना मुलाला खूप आनंद झाला होता.

शोभून दिसणारं मानसीचं सौंदर्य राघवने कॅमेऱ्यात टिपलं. दोघेही इंस्टावर टाकण्यासाठी मोबाईलमध्ये छान छान फोटो काढले. फोटो काढून झाल्यावर निंदायला चालू केली. चार तणकटाचे धाटं अर्ध्यातुन कापून काढली. गवतासोबत आठ दहा गव्हाचेही दाटं कापली. हे चित्र सगळं राघव पाहत होता. तेवढ्यात भाऊ हर्षचा मानसीला फोन आला,

हायऽऽ दीदी, हाऊ आर यू? आय ॲम फाईन..! काय करतेस? काही नाही रेऽऽ मी शेतावर निंदायला आले.. अरे, शेती खरच किती छान असते. किती छान झाडं...शेतामध्ये थोडा थोडा चिखल आहे... बाजूला मेथीला सोडलेलं पाणी आहे. हे सारे पाहून मला ना खूप छान वाटते आहे रे... तू काय करतोस हर्ष? काय नाही, मॉमला तुझी आठवण आली म्हणून लावला फोन बर मी संध्याकाळी फोन करते हंऽऽ आता मी शेतावर आहे. बाया निंदाय लागल्यात.. त्यामुळे आता कामात आहे. करते नंतर हांऽऽ ब, बाय असं म्हणून फोन ठेवला. इकडे निंदायला आलेली सगुनाबाई कूच कूच करत म्हणाली, काय काम जमंल माय शेतातलं तिला? हाताला फोड येतात.. पायाला फोड येतात... अन् असल्या उन्हातल्या कामाने अंगाचा रंग बी काळा पडून जाईल... बाई, तिकडे काचात राहिलेली पोरगी हाय असं म्हणतात...अशी चालू असलेली सगुनाबाईची बडबड सोनाबाईला बंद कराव वाटत होतं. तीनं गप्प बसावं वाटत होतं. पण तसं झालं नाही. सोनाबाई म्हणाली, हळूहळू शिकंल ग माय काय अवघड असते? सुरुवातीला त्रास होईल थोडा. मग म्हागून शिकून जाईल की सगळं हे सगळं दोघींचं बोलणं ऐकून भाकरी करायला घेतलेल्या उनवणीच्या काळ्या पाण्याला उकळी फुटावी तशी चित्राबाई सरसावली अन् म्हणाली, उगं सोंग करून ठेवलं ग माय... खेड्यातलीच पोरगी केली असती तर रोज कंबरंला इळा खऊन शेताकडे जात ऱ्हायली असती. आणिक चार दाणे आगाऊबी पिकले असते. हे फाय की कसलं सोंग करून ठेवलय... मला तर सोंगच दिसते माय. असला नाजूकपणा घेऊन काय करील माय ती? धुरपताबाईलाही यात कधी उडी टाकावं अन कधी नाही असं झालं होतं. म्हणाली, मला तर लय कळकळ आली बघा या गोऱ्या पोरीची.. तिने पान खाल्ली तर तिच्या नरड्यातून दिसंल इतकी गोरी पान हाय... अन शाळा बी लय शिकली म्हण. तिकडेच तिच्या पप्पाला का टप्पाला सांगून नोकरीवाला नवरा करून दे म्हणाव की नाही असं म्हणत बाया निंदत राहिल्या. मानसी फिरत फिरत गेली अन् आंब्याच्या झाडाला बघितली. म्हणाली, अहो डियर! कम हेअर हे ऐकुन राघव आला. जवळ आल्यावर म्हणाली, अजून पेरू का लागले नाहीत?

मानसी! आगं ते आंब्याचं झाड आहे. आता तर त्याला तोर आलाय... मग आंबे लागतात. उन्हाळ्यात आपण पुरणपोळी सोबत आमरस करतो का नाही? त्याचं झाड आहे... ओके, ओके थँक्यु! धुऱ्यावरचं प्रत्येक झाड पाहू लागली.आंब्याचं, चिंचचं, जांभळाचं, पुढे जाऊन पेरुच्या झाडाचे हाताने तोडून पेरू खाल्ली. तसेच बोरीचे बोरंही खाल्ली.तिच्या मनात शेतीची प्रचंड आवड होती. म्हणून तर तिने स्वतः निर्णय घेऊन शेतकरी नवरा करुन घेतला. ती मनात हाच विचार करू लागली होती की, आता आपल्याला हळूहळू शेती करायला शिकायची आहे. प्रत्येक कामाची सवय करून घ्यायची आहे. म्हणून नाजूक पायाने चालू लागली. कापसाच्या रुई सारखे पाय पोरीचे. पण तिने अनवाणी पायाने शेताने फिरू लागली. ढेकळाने मातीने चिखलाने फिरू लागली. कारण तिला सवय करून घ्यायची होती. तिला शेतकऱ्यांचं जगणं शिकून घ्यायचं होतं. प्रचंड आवड असलेली मुलगी शेतातल्या पहिल्याच दिवशी बरच काही जाणून घेतली होती. दिवस मावळायला आला होता. घराकडे जायची लगबग सुरू झाली होती. मानसीने परत दुरडी घेतली. त्या दुरडीमध्ये पातीचे कांदे, बोरं, जांब, चिंचा, मेथीची भाजी आणी उद्यासाठी भाजीला पालकही घेतली.

सुगंधीसाठी कोथिंबीरही घेऊन सासू सोबत घराकडे निघाली... मुलाला नौकरी लागलेली बातमी सांगायची होती, पण मानसीच्या आनंदात राघव विसरून गेला होता. पुन्हा राघवला वाटलं संध्याकाळी सांगावं. घरी येऊन बायांनी स्वयंपाक केला. जेवण झाले. झोपायच्या वेळेला मानसीला आच्याणक ताप आला. शेतावर जाबं, बोरं खाली होती म्हणून तिला सर्दी झाली. खुप ताप चढला होता. माझ्याकडे येऊन राघवणं सांगितलं. बाबा, मनसीची तब्येत बिघडली काय झाल? ताप आलाय.. मग आम्ही नवरा-बायको गेलो. मानसीच्या कपाळावर हात ठेऊन विचारलं काय झालं बाळा? काही नाही पप्पा, बरी आहे. बरं राघवच्या आईने राघवला म्हणाली, राघव, मानसीच्या पायाला बघ. बरं आई म्हणून राघवनं पाहिलं. चालून चालून फोडं आले होते. त्यातले काही फोडं फुठूनही गेले होते. तरी ती तशीच चालत होती. काही कळूच दिली नाही. त्यातील काही फोडं फुटून त्यांचा आकार हा अर्ध्या आकृती चंद्रासारखा दिसत होता. हे कळताच म्हणालो, राघव, पायाला औषधी लावून दे आणि डोक्यालाही बाम लाव. सोबतच थोडावेळ मानसीचे पायही दाबून दे. तेवढ्यात मानसी म्हणाली. नाही पप्पा, मिस्टरने पाय दाबायचे नसतात. तर मिस्टरचेच पाय दाबायचे असतात. तसं काही नाही, मी सुद्धा माझ्या बायकोचे पाय दाबलेत... म्हणून ती इतकी छान माझ्यासोबत आहे. हो की नाही? असं माझ्या मालकीणबाईकडे बघत म्हणालो.तिची तब्येत बिघडते तेव्हा तिची आई असते ना वडील. मग तिचे पाय कोण दाबणार? तेव्हा ही गोष्ट पटली आणि राघवणं तिचे पाय दाबले...गुड नाईट म्हणून सुनबाई शांत झोपी गेली. सुनेला खुप सारा त्रास झाला होता. शेतीच्या आनंदापुढे काहीच वाटलं नाही. शेतीमध्ये काम करण्याची तिची प्रचंड इच्छा होती. म्हणून ती सहन करत राहिली. दुसऱ्या दिवशी सकाळी नौकरी लागलेली बातमी मुलांने आई-बाबांना सांगितली तेव्हा आनंद ओसंडून वाहू लागला होता. पुन्हा ती शेतावर गेली. सुनेचा पिकांवर कधी कधी फिरु लागला तसं तसं रास ही वढत राहू लागली. तेव्हापासून आम्ही तिच्याच विचाराने शेती करतो. तिलाही शेतकरी नवरा करून घेतल्याचा अधिक आनंद आहे, अभिमान आहे. काही दिवसांनी तिलाही नौकरीसाठी कॉल आला. नौकरीला तिने नकार देऊ लागली होती. पण, मुलगा, मी आणि माझ्या बायकोनेही तिला नोकरीसाठी राजी केलं. ती नौकरीवर गेली. मुलगाही नोकरीवर गेला. नौकरी सोडून शेतीच करावं असं मत मानसीचं अजूनही आहे. अशावेळी घरचे सगळेजन आजकालच्या जमान्याला नौकरी किती महत्त्वाची आहे हे पटवून देतात. तर शेती किती महत्त्वाची आहे हे सुनबाई पटवून देत असते.

**–गोविंद कवळे**
इळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड
मो. ७३८७२६७२१९

# जागतिक रक्तदाता दिन

आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅडस्टेनर यांनी 'एबीओ' हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो.

माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते.



कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात.

रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते.

अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२२५४६२९५

## प्रस्तराचे अस्तर

त्या अनवट वाटेवरती
ती मजला भेटत होती
संचिताचे प्रस्तर उकळत
मलाच अस्तर देत होती
चालताना माझीच वाट
वळणावर ती भेटत होती
रुंदनगुज आव्हानाचे
मलाच मी हरवत होती
एकाच वेळी सगळ्या
आघाड्या सांभाळत होती
कर्तव्याची श्रृंखला ती
नवनीत ओवीत होती
ती भेटली पाषाणावर
हातोड्याने प्रहार करताना
छिनून उखळ जाती बत्ते
महादेवांच्या पिंडी डोई घेताना
ती भेटली विकताना
सुई-पोत मनेरी पेटी
हाका देता लेकरांच्या मायांना
असते बांधून बाळ ओटी
अंगावर संसाराचा भार पेलत
जगण्यास बळ शोधीत होती
हजारदा मन मारीत मारीत
दुनिया तिची जगवत होती
त्या अनवट वाटेवरती
ती मजला भेटत होती
प्रस्तराचे अस्तर लेत
मी मलाच गवसत होती.

**–अनिता दाने**
नांदेड

## रंग, गंध हे कुणी उधळले?

सचैल तरुवर थेंब टपोरे
शिवार भिजूनी चिंब ओले
रानफुलांनी सजले डोंगर
रंग,गंध हे कुणी उधळले?
सोनपीवळे,केशर ल्याले
नभात तोरण कुणी बांधले?
अद्भुत लीला निसर्गाची
फुलाफळांनी वृक्ष लगडले
संथ लयीत वाहाता सरिता
संगित अनाम कुणी छेडले?
अमृतमय जल थेंबाचे
कसे बरसती मेघ काफीले?
गर्भारलेल्या सृष्टीलाही
नवनिर्मीतीचे लागती डोहाळे
प्रसवता कोंब इवले...
साजरे होती ऋतुसोहळे !!

**–रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड

# पाणपोई लुप्त होणे : एका संस्कृतीच्या अस्ताची चाहूल

यंदा जून महिना अर्धा उलटूनही देशातील अनेक भागांत समाधानकारक पावसाची सुरुवात झालेली नाही. अनेक ठिकाणी उष्णतेची तीव्रता अद्याप कायम असून पाण्याचे दुर्भिक्षही जाणवत आहे. अशा परिस्थितीत प्रवाशांना आणि सर्वसामान्य नागरिकांना थंड, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर एकेकाळी सर्वत्र दिसणाऱ्या पाणपोईंची आठवण अधिकच अस्वस्थ करते.मोफत पिण्याच्या पाण्याच्या (पाणपोई) परंपरेचा अंत म्हणजे एका संस्कृतीचा अंत आहे. कोणतीही परंपरा दीर्घकाळ जोपासली गेली की ती संस्कृतीत रूपांतरित होते. मोफत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही मानवी संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. एका माणसाचे दुसऱ्या माणसावरील हे निस्वार्थ प्रेम बाटलीबंद पाण्यापेक्षाही अधिक गोड आणि समाधान देणारे आहे. म्हणूनच आपण आपली ही परंपरा आणि संवेदनशीलता दोन्ही जिवंत ठेवली पाहिजेत.

समाजातील काही जुन्या परंपरा संपल्याने कधीकधी आनंद होतो; परंतु आधुनिकतेच्या नावाखाली मानवी मूल्यांवर आधारित परंपरा नष्ट होत असताना मन विषण्ण होते. अशीच एक परंपरा म्हणजे पाणपोई. उन्हाळ्यात विनामूल्य पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची ही प्रथा आज बाटलीबंद पाण्याच्या संस्कृतीत लुप्त होत चालली आहे.

पूर्वी गावे, शहरे, बसस्थानके आणि रेल्वे स्थानकांवर पाण्याने भरलेले मातीचे डेरे ठेवले जात. त्यामुळे ये-जा करणाऱ्यांना सहज पाणी उपलब्ध होत असे. प्रवाशांना तहान लागली की ते पाणपोईचा आधार घेत. आज मात्र सर्वत्र पाण्याच्या बाटल्या उपलब्ध असल्याने पाणपोई क्वचितच दिसतात. रेल्वे स्थानकांवर किंवा बसस्थानकांवर साधे पिण्याचे पाणी मिळण्याऐवजी बाटलीबंद पाणी विकत घ्यावे लागते, ही वस्तुस्थिती अनेक प्रश्न निर्माण करते. विशेष म्हणजे या पाणपोई बहुतेक वेळा दानशूर व्यक्ती किंवा संस्थांच्या देणगीतून चालवल्या जात असत.




आज एखाद्या ठिकाणी पाणपोई सुरू झाल्याची बातमी आली तर ती अपवादात्मक वाटते. पूर्वी एखादा प्रवासी दूरवरून गावात किंवा शहरात पोहोचला की सर्वप्रथम पाणपोई शोधत असे. तिथे मिळणाऱ्या थंडगार पाण्याने त्याची तहान भागत असे आणि मनालाही समाधान मिळत असे. आज सार्वजनिक ठिकाणी एक ग्लास पाणी सहज मिळणे कठीण झाले आहे.

पाण्याच्या व्यवसायीकरणामुळे पाणपोईंची परंपरा हळूहळू संपुष्टात येत आहे. सर्वत्र बाटलीबंद पाणी उपलब्ध होण्याच्या प्रवृत्तीने सार्वजनिक पाणीपुरवठ्याची संस्कृतीच मागे पडली आहे. हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समध्येही आता पाण्याच्या बाटल्या अन्नासोबत दिल्या जातात आणि त्याची किंमत ग्राहकाकडून आकारली जाते. वस्तुतः पाण्याच्या या व्यापारीकरणासाठी आपण सर्वच काही प्रमाणात जबाबदार आहोत.

पाणी हे आपल्या शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते दूषित पाण्यामुळे अनेक आजार उद्भवू शकतात. त्यामुळे घराघरांत आरओ यंत्रे बसविली जात आहेत. परंतु आरओ प्रक्रियेत पाण्यातील काही उपयुक्त खनिजे कमी होतात, तसेच मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाते, हीदेखील वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याच्या सार्वजनिक आणि सामुदायिक व्यवस्थांचे महत्त्व अधिक वाढते.

आज उष्णतेच्या लाटा, पाण्याची टंचाई आणि वाढते शहरीकरण यामुळे पाणपोईंची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, ग्रामपंचायती, नगरपालिका आणि दानशूर नागरिक यांनी उन्हाळ्यात तसेच पावसाळ्याच्या उंबरठ्यावरही सार्वजनिक ठिकाणी पाणपोई उभारण्याचा विचार करणे आवश्यक आहे.कारण मोफत पिण्याच्या पाण्याच्या परंपरेचा अंत म्हणजे केवळ एका सुविधेचा अंत नाही; तो माणुसकी, सहवेदना आणि सामाजिक बांधिलकी यांच्या संस्कृतीच्या अस्ताची चाहूल आहे. पाणपोई ही केवळ पाण्याची व्यवस्था नसून ती भारतीय समाजातील परस्पर प्रेम, करुणा आणि सेवाभावाचे प्रतीक आहे. ही परंपरा जपणे म्हणजे आपल्या संस्कृतीचे थंडगार, जीवनदायी झरे जिवंत ठेवणे होय.

**– प्रा. विजय व्ही. कोष्टी**
कवठेमहांकाळ, जि. सांगली

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने मान्सूनपूर्व रंगीत तालीम





**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने जिल्हास्तरीय मान्सून–२०२६ पूर्व तयारी–पूरपरिस्थितीमध्ये करावयाचे शोध व बचाव कार्याबाबत रंगीत तालीम सराव सत्र काळेश्वर घाट विष्णुपुरी नांदेड येथे आज घेण्यात आली. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शन व प्रमुख उपस्थितीत सदर रंगीत तालीम सराव सत्र संपन्न झाले.

या रंगीत तालीममध्ये पूर परिस्थितीत शोध व बचाव कार्य कसे करायचे, काय पूर्वतयारी करायची, आयआरबी बोट कशी असेंबल करायची तसेच पूरपरिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्यास आवश्यक साहित्य परिचय तसेच ते साहित्य कशाप्रकारे हाताळायचे याबाबत प्रशिक्षण व प्रत्यक्ष हाताळण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. सदर रंगीत तालिमेत प्रशिक्षण हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत असलेले अग्नीशमन दल, नांदेड पोलीस शिघ्र प्रतिसाद दल, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे वैद्यकीय पथक, तहसील कार्यालय नांदेड यांच्याकडून संयुक्त समन्वयातून देण्यात आले.

यावेळी नांदेड शहर महानगरपालकिच्या वतीने अग्नीशमन अधिकारी केरोजी दासरे यांच्यासोबत उपअग्नीशमन अधिकारी निलेश कांबळे यांनी आयआरबी बोट कशी असेंबल करायची व पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्य कसे करायचे व त्याकरिता कोणते साहित्य वापरायचे याबाबत सखोल मार्गदर्शन केले, पोलीस विभागाच्यावतीने उपअधीक्षक शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पीआय दर्शने यांच्यासह क्यूआरटीचे ज्ञानोबा चोंडे यांनी पोलीस शिघ्र प्रतिसाद दलाकडून मागील वर्षी करण्यात आलेल्या शोध व बचाव कार्याबाबतची माहिती दिली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत डॉ. सुनील कुलकर्णी व सचिन कोताकोंडावार यांनी सीपीआर बाबत सखोल माहिती दिली व प्रत्यक्ष सराव प्रात्यक्षिक करून घेतले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी मागील वर्षी शोध व बचाव कार्य चांगल्या पद्धतीने केल्याबद्दल सर्व संबंधित यंत्रणांचे कौतुक केले. यावर्षी सर्वांनी प्रशिक्षित होऊन एकमेकांच्या समन्वयातून आपण मान्सून २०२६ करिता चांगल्या पद्धतीने तयारी करून सज्ज राहुया असे मनोगत व्यक्त केले.

विठ्ठल परळीकर तहसीलदार लोहा, संजय वारकड तहसीलदार नांदेड यांनी मागील वर्षीचे पूर शोध व बचाव कार्याबाबतचे अनुभव मांडले. तसेच यावर्षीच्या मान्सून करिता आपण सर्व तयारीनिशी सज्ज राहावे असे मनोगत व्यक्त केले. तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश कांबळे व डॉ. प्रवीण मुंडे यांनी मान्सूनमध्ये आरोग्याची कशी दक्षता घ्यावी, पाणी शुध्दीकरण व पूरपरिस्थिती नंतर घ्यावयाची काळजी, बाबत तसेच गरोदर महिलांबाबत काय दक्षता घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. सदर रंगीत तालीम प्रशिक्षणाचे समन्वयाची भूमिका किशोर कुऱ्हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी पार पाडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार सुनील माचेवाड यांनी केले तर प्रास्ताविक गौरव तिवारी डीडीएमएस, आभार प्रदर्शन बारकुजी मोरे महसूल सहायक यांनी केले. यावेळी नांदेड जिल्ह्यातील सोळा तहसील कार्यालय, पंचायत समिती, कृषी, आरोग्य, नगरपालिका, पोलीस विभागातील जवळपास अडीचशे ते तीनशे अधिकारी, कर्मचारी यांनी या प्रशिक्षणात सक्रीय सहभाग घेतला. सदर रंगीत तालीम यशस्वी करण्याकरिता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड व तहसील कार्यालय नांदेडच्या अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नांदेड जिल्ह्यातील रुग्णालयांचे अंगीकरण होण्यासाठी जिल्हास्तरीय बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने शनिवारी रुग्णालयांचे अंगीकरण होण्यासाठी जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे स्वीय सहायक डॉ. आनेराव यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.

यावेळी जिल्ह्यातील गरजू रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजना यांचा एकत्रित लाभ मिळावा, यासाठी अधिकाधिक खाजगी रुग्णालयांनी यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील १० व त्यापुढील बेड क्षमतेच्या रुग्णालयांच्या प्रतिनिधींना बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. बैठकीत राज्य आरोग्य सोसायटी, वरळी (मुंबई) येथील सहायक संचालक डॉ. रवींद्र शेटे यांनी महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध आरोग्य सेवांची सविस्तर माहिती दिली.

यावेळी सांगण्यात आले की, या योजनांमुळे पात्र आणि गरजू रुग्णांना मोफत उपचारांची सुविधा उपलब्ध होत असून, त्यामुळे त्यांच्यावर होणारा आर्थिक ताण कमी होण्यास मदत होते. तसेच काही उपचारांसाठी देण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीत वाढ करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

नांदेड जिल्ह्यात सध्या एकूण २५६ रुग्णालये असून, त्यापैकी १४२ रुग्णालये या योजनेत समाविष्ट आहेत. बाकी ११४ रुग्णालये अद्याप या योजनांशी संलग्न नाहीत. त्यामुळे संबंधित रुग्णालयांनी या योजनांमध्ये सहभागी होऊन अधिकाधिक रुग्णांना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

बैठकी दरम्यान उपस्थित अंगीकृत रुग्णालयांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अडचणी आणि सूचना देखील मांडल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, सार्वजनिक आरोग्य विभागाचे स्वीय सहायक डॉ. आनेराव, जिल्हा शल्य चिकित्सक संजय पेरके, राज्य आरोग्य सोसायटीचे सहायक संचालक डॉ. रवींद्र शेटे, जिल्हा समन्वयक आयुष्मान भारत डॉ. दीपक वाघमारे, महानगरपालिकेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रिटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी तसेच नांदेड जिल्ह्यातील खाजगी वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# विष्णुपुरी येथे ७ दिवसीय शिवमहापुराण कथा महोत्सवास प्रारंभ –माजी आमदार पोकर्णा यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरापासून जवळच असलेल्या विष्णुपुरी येथील श्री सत्संग सेवा समिती, काळेश्वर यांच्या वतीने सात दिवसीय शिवमहापुराण कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. १४ जूनपासून सुरू होणारा हा धार्मिक सोहळा शनिवार, दि. २० जून रोजी संपन्न होणार आहे. या निमित्त दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत कथा प्रवचनाचा कार्यक्रम होणार असल्याचे माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

महोत्सवात शिवमहापुराणाचे अभ्यासक व प्रसिद्ध कथाकार ह.भ.प. शिवम शुक्ल महाराज यांच्या रसाळ वाणीमधून शिवमहापुराणाचे निरूपण होणार आहे. भगवान शिवाच्या विविध लीला, धर्म, अध्यात्म, संस्कार व भक्तीचे महत्त्व कथेद्वारे भाविकांसमोर उलगडले जाणार आहे.

कथेच्या पहिल्या दिवशी शिवमहापुराण महात्म्य, दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी नारदमोह, कुबेर यांचे पूर्वचरित्र, चौथ्या दिवशी सती चरित्र व शिव–सती विवाह, पाचव्या दिवशी पार्वती प्राकट्य व शिव–पार्वती विवाह सोहळा, सहाव्या दिवशी कार्तिकेय व श्रीगणेश प्राकट्य, तर सातव्या दिवशी त्रिपुरासुर वध, जालंधर उद्धार आणि भगवान शिवाच्या विविध अवतारांचे वर्णन करण्यात येणार आहे.

कथा समाप्तीनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी श्री सत्संग सेवा समिती, काळेश्वरचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्यासह समितीच पदाधिकारी विशेष परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमाचे आयोजन काळेश्वर सत्संग सभागृह, विष्णुपुरी नांदेड येथे करण्यात आले आहे.

# ऑनलाईन योग सत्रामध्ये सहभागी होऊन गिनीज बुकमध्ये जागतिक विक्रम करण्याचा प्रयत्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –आयुष मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. सदर उपक्रमांतर्गत योगाचा प्रसार, जनजागृती तसेच नागरिकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ऑनलाईन योग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सदर ऑनलाईन योग सत्र दि. १४ जून,२०२६ रोजी सकाळी ६.१५ ते ७.१५ या वेळेत आयोजित करण्यात येणार असून, या उपक्रमाद्वारे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करण्याचा मानस असल्याचे या उपक्रमाचे आयोजन आयुष मंत्रालय, भारत सरकार व हॅबिल्ड हेल्थटेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे.

या योग सत्राचे प्रक्षेपण आयुष मंत्रालयाच्या अधिकृत युट्युब प्लॅटफॉर्मवर करण्यात येणार आहे. उपक्रमामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी इच्छुकांनी टोल फ्री क्रमांक १८००–३१५–७००८ वर मिस्ड कॉल देऊन पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित सहभागीस सत्राची लिंक व आवश्यक सूचना संदेशाद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या निकषांनुसार प्रत्येक सहभागीने स्वतःच्या स्वतंत्र डिजिटल उपकरणावरून (मोबाईल/लॅपटॉप/ टॅब) सत्रात लॉग–इन करणे आवश्यक राहील. नोंदणीकृत प्रत्येक उपकरणाची स्वतंत्र सहभाग नोंद ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील विविध क्रीडा संघटनेचे खेळाडू, प्रशिक्षक व पदाधिकारी यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, आवाहन करण्यात येत आहे.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचा (शप) वर्धापनदिन उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) पार्टीचा २७ वा वर्धापनदिन शहर जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम यांच्या मार्गदर्शनातून दि. १० जून रोजी नांदेडमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) पार्टीच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून डॉक्टरलाईन येथील नांदेड शहर जिल्हा पक्ष कार्यालयात पक्षाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष तातेराव पाटील आलेगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक प्रकाश मुराळकर, लक्ष्मणराव भवरे, डॉ. दत्तात्रय कदम, नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नाना पोहरे, सेवा सहकारी सोसायटी लिंबगावचे चेअरमन दिगांबर पोपळे पाटील, सामाजिक न्याय विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष मारोती चिवळीकर, ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष गंगाधर महाजन, तरविंदसिंघ बडगुजर, युनूसखान, शेख रसूल, पाशा तांबोळी, महिला आघाडीच्या सईदा पठाण, अमिर अमजा आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मराठवाडा लोकसेवा मंडळ संचलित नेरली कूष्ठधाम येथेही पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त अन्नदान करण्यात आले.

## हैदराबाद विभागातील रोलिंग ब्लॉकमुळे काही गाड्यांचे नियमन

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या हैदराबाद विभागातील काचीगुडाधोने आणि काचीगुडामेडचल दरम्यान जून २०२६ महिन्यात विविध अभियांत्रिकी कामांसाठी रोलिंग ब्लॉक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम ११ जून २०२६ ते ११ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, त्यामुळे काही प्रवासी गाड्यांचे नियमन करण्यात आले आहे. यामुळे काही गाड्या उशिरा धावणार आहेत, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

गाडी क्रमांक १७०५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस–लिंगमपल्ली देवगिरी एक्सप्रेस दि. १७ जून २०२६ रोजी ४५ मिनिटे व दिनांक १९ जून २०२६ रोजी ६० मिनिटे उशिरा धावेल.

# गोटपॉक्स लसीकरण : पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लसमात्रांचे वाटप सुरू

## मोहीम गतिमान करण्याचे आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यातील गाय वर्ग पशुधनाला लम्पी चर्म रोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६–२७ या वर्षाकरिता आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' येथे सुरू झाले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्ह्यानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन, पहिल्या टप्प्यात एकूण लस उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध रीतीने सुरू करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही याची काटेकोर दक्षता घ्यावी, गोटपॉक्स लस मात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादन क्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा, अशा सूचना 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना केल्या आहेत.

**हॉटस्पॉट तालुक्यांवर विशेष लक्ष**

गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लंपी चर्म रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला होता, त्या भागात प्राधान्य क्रमाने लसीकरण मोहीम राबवावी. या व्यापक मोहिमेसाठी जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था तसेच खाजगी पशुवैद्यक व सेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय यंत्रणेला करण्यात आले आहे.

**पशुधनाच्या सुरक्षिततेला प्राधान्य**

लंपी चर्म रोग यासारख्या संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्षा करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या एन.सी.सी कॅडेट्ची राष्ट्रीय थल सेना शिबिरासाठी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**–नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या एन.सी.सी. कॅडेट सुरज बामनाजी डावरे, धीरज सतीश साखरे यांची टी.एस. सी (थल सैनिक कॅम्प) प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे.

कठोर शारीरिक चाचण्या, नकाशा वाचन, अडथळा शर्यत, फील्ड सिग्नल, नेतृत्वगुण आणि शिस्त यांसारख्या विविध निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत या कॅडेट्सनी हे यश संपादन केले आहे.

थल सैनिक कॅम्प (टी.एस.सी.) हे एन.सी.सी मधील अत्यंत मानाचे प्रशिक्षण शिबीर मानले जाते, ज्यामध्ये सहभागी होण्यासाठी राज्यस्तरीय निवड प्रक्रियेत यश मिळवावे लागते. या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, एन.सी.सी अधिकारी तथा संख्याशास्त्र विभाग प्रमुख अधिकारी लेफ्टनंट डॉ. किशोर इंगळे यांनी निवड झालेल्या कॅडेट्सचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच राष्ट्रीय शिबिरासाठी व प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी मानाचा तुरा खोवला गेला असून, इतर विद्यार्थ्यांनाही एन.सी. सी मध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे, कोषाध्यक्ष कैलासचंद काला, सचिव ॲड सौ. वनिताताई जोशी, सहसचिव धनंजयराव जोशी, ५२ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी नांदेडचे कमांडिंग ऑफिसर कर्नल दिलीप रेड्डी व अन्य मान्यवरांनी कॅडेट्सचे अभिनंदन केले आहे.

# लोहा शहर व तालुक्यातील इंग्रजी शाळांची मनमानी थांबविण्याची मागणी

**लोहा (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील १५ जूनपासून शाळा सुरू होत असून, शाळा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे प्रवेस घेणे सुरू असते. तेव्हा लोहा शहर व तालुक्यातील काही इंग्रजी शाळा चालकांनी मनमानी सुरू केली आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी त्यांच्या पालकांकडून अव्वाच्या सव्वा फीस उकळणी सुरू आहे. तेव्हा या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी लक्ष देऊन इंग्रजी शाळांच्या मनमानीला आळा घालावा, अशी मागणी लोहा येथील सामाजिक कार्यकर्ते रुद्रा पाटील भोस्कर यांनी केली आहे.

लोहा शहर व तालुक्यात अनेकांनी शिक्षणाचे बाजारीकरण केले इंग्रजी शाळांची दुकानदारी थाटली आहे. जास्तीत जास्त नफा या धंद्यातून कसा मिळतो व विद्यार्थ्यांच्या पालकांची कशी आर्थिक लूट करता येईल असा बेत आखला जात आहे. यात अनेक शाळांना शिक्षण विभागांची मंजुरी नाही. तसेच काही शाळांना शिक्षण विभागांची मंजुरी असली तरी त्या शासनाने दिलेल्या अटी आणि नियमांचे पालन करीत नाहीत.

लोहा शहर व तालुक्यातील इंग्रजी शाळा चालक मनमानी कारभार सुरू करुन अव्वाच्या सव्वा फीस पालकांकडून उकळीत आहेत. तेव्हा याकडे शिक्षण विभाग व जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून सर्वसामान्य नागरिकांची होणारी लूट थांबवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रूद्रा पाटील भोस्कर यांनी केली आहे. या मागणीची दखल घेतली नाही तर शासन दरबारी आवाज उठविणार असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# 'एमजीएम'मधील बी.टेक. मेकॅनिकलच्या विद्यार्थ्यांची १०० टक्के प्लेसमेंट



**नांदेड (प्रतिनिधी)** –एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या चालू शैक्षणिक वर्षात बीटेकच्या अंतिम वर्षांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटच्या माध्यमातून नुकतीच नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

पारंपरिक अभियांत्रिकी शाखा व शैक्षणिक क्षेत्रात आणि रोजगाराच्या दृष्टीने ही एक अत्यंत दुर्मीळ आणि ऐतिहासिक कामगिरी मानली जात आहे. इन्फोसिस, सिग्मा इलेक्ट्रिक मॅन्युफॅक्चरिंग पुणे, ऑरबीटल इलेक्ट्रो मेकॅनिकल पुणे आणि व्हॉल्वो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आदी कंपन्यांनी या विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

या कंपन्यांच्या मानव संसाधन अधिकाऱ्यांनी एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षांतील ३७ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान, बौद्धिक क्षमता आणि तांत्रिक ज्ञान तपासण्यात आले आणि वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त या विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे विशेष प्रशिक्षण महाविद्यालयातर्फे देण्यात आले होते.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेलचे मोठे योगदान असल्याचे डायरेक्टर डॉ. गीता लाठकर म्हणाल्या.

या विक्रमी निकालामुळे कॉलेजमध्ये आनंदाचे वातावरण असून, संस्थाध्यक्ष कमलकिशोर कदम, डायरेक्टर डॉ. गीता लाठकर, उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे, विभागप्रमुख डॉ. जसबीरसिंग सिदधू आणि सर्व प्राध्यापकांनी या यशवंत विद्यार्थ्यांचे व टीपीओ प्रा. शिवप्रसाद तितरे तसेच ट्रेनिंग प्लेसमेंट विभागाचे अभिनंदन केले आहे.

# विश्वाकार आयुर्वेद हॉस्पिटलच्या कार्याची विशेष दखल

## डॉ. स्वप्नील दुद्दलवार यांची पत्रकार परिषदेमध्ये माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)** –इंदौर येथे ६ व ८ जून रोजी झालेल्या ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमची आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. यामध्ये भारतीय आयुर्वेदाचा जागतिक स्तरावर गौरव करण्यात आला आहे. विश्वाकार आयुर्वेद हॉस्पिटलच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आल्याची माहिती येथील विश्वाकार आयुर्वेद सुपर स्पेशालिटी, पंचकर्म व रिसर्च सेंटरचे संस्थापक डॉ. स्वप्नील दुद्दलवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याची जीवनशैली आहे. इंदौर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमुळे आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या मार्गदर्शनामुळे भारतीय आयुर्वेदाला जागतिक स्तरावर मोठी संधी प्राप्त झाली आहे. कॅरिबियन आणि लॅटिन अमेरिकन देशांशी सुरू झालेल्या या सहकार्यामुळे हजारो रुग्णांना नैसर्गिक, सुरक्षित आणि परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध होईल. जगभरातील रुग्णांना शुद्ध, सुरक्षित आणि परिणामकारक आयुर्वेद उपचार उपलब्ध करन देणे हे आमचे ध्येय आहे. नांदेडमधून सुरु झालेला हा आरोग्यसेवेचा प्रवास आता जागतिक स्तरावर पोहचत असून, भविष्यात विविध देशांतील रुग्ण उपचारासाठी नांदेडमध्ये येतील, असा दृढ विश्वासही डॉ. स्वप्नील दुद्दलवार यांनी परत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केला. पत्रकार परिषदेला डॉ. तृप्ती दुद्दलवार, आयुर्वेद व पंचकर्म तज्ज्ञ डॉ. महेश सवंडकर उपस्थित होते.

# प्रगतीमंत्र

# ‘एचआर’वरच असं पाडा इंम्प्रेशन!

**कॉलेज सोडल्यानंतर पहिल्या नोकरीमध्ये (Job 2022) तुम्हाला अनेक आव्हाने आणि संघर्षांना सामोरे जावे लागते. मग ते मुलाखतीशी संबंधित किंवा कामाशी संबंधित आव्हान असू शकते. मुलाखतीदरम्यान कोणते प्रश्न विचारले जातील? आणि त्याची तयारी कशी करावी? इत्यादींचा आपण अनेकदा विचार करत असतो. या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्ही या लेखाद्वारे देत आहोत. हे प्रश्नच एचआरद्वारे (Human Resource, HR) फ्रेशर्सना (Freshers) विचारले जातात. या प्रश्नांच्या मदतीने, फ्रेशर्स मुलाखतीदरम्यान सहज आपले पहिले इंम्प्रेशन पाडू शकतात.**



## स्वत:बद्दल सांगा

‘स्वतःबद्दल सांगा’ हा एक असा प्रश्न आहे जो नेहमी विचारला जातो. समोरची व्यक्ती नवीन आहे की अनुभवी आहे, हे या प्रश्नाचे उत्तर देण्यावरून कळते. हा प्रश्न उमेदवार आणि मुलाखतकार यांच्यातील संभाषणाला सुरुवात म्हणून काम करतो. जेव्हा एचआर किंवा मुलाखतकार तुम्हाला असे प्रश्न विचारतो याचा अर्थ असा होतो की, त्याला तुमच्याबद्दल जाणून घ्यायचे आहे. ज्याचा CV मध्ये उल्लेख नसेल.

## हेच का निवडले?

फ्रेशर्ससाठी एचआर मुलाखतीच्या इतर प्रश्नांपैकी, ‘तुम्ही हे करिअर का निवडले?’ हा प्रश्न सर्वात महत्वाच्या प्रश्नांपैकी एक आहे. उमेदवाराला या क्षेत्रात खरोखर रस आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी भरती करणारे हा प्रश्न विचारतात.

## ड्रीम जॉब काय?

तुमचा ड्रीम जॉब काय आहे? हा एचआरने विचारलेल्या सर्वात लोकप्रिय मुलाखतीच्या प्रश्नांपैकी एक प्रश्न आहे. विद्यार्थ्यांनी मुलाखतीला जाण्यापूर्वी या प्रश्नाची तयारी करणे आवश्यक आहे. तुमच्या प्रश्नातूनच उपप्रश्न तयार होणार आहेत. त्यामुळे या प्रश्नाचे प्रामाणिकपणे उत्तर द्यावे.

## तुम्ही तणाव आणि दबाव कसे हाताळता?

ताणतणाव आणि दडपण हे कामाच्या आयुष्यातील एक भागआहे. इथले स्ट्रेस आणि प्रेशर हे महाविद्यालयीन



जीवनातील तणावापेक्षा खूप वेगळे आहेत. फ्रेशर्ससाठी एचआर मुलाखतीत विचारलेला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तुम्ही तणाव आणि दडपणाखाली कसे काम करता, हे या प्रश्नाच्या माध्यमातून तुमच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

## तुम्हाला इतर काही प्रश्न आहेत का?



एचआर मुलाखतीच्या प्रश्नांपैकी हा एक प्रश्न आहे. ज्याची तयारी फ्रेशर्सनी आधीच केली पाहिजे. भरती करणारे नेहमी हा प्रश्न विचारतात. या प्रश्नामुळे फ्रेशर्सच्या मनातील सर्व शंका दूर होऊ शकतात.

## पगाराची अपेक्षा

हा सर्वात लोकप्रिय प्रश्नांपैकी एक आहे. जो तुम्हाला प्रत्येक नोकरीच्या मुलाखतीत विचारला जाईल. पण या प्रश्नाचे उत्तर अतिशय काळजीपूर्वक दिले पाहिजे. आपला आधीचा पगार, आधीच्या नोकरीत मिळणारी संभाव्य पगारवाढ, मेडिक्लेम, पीएफ असे मिळणारे भत्ते, या सर्वांचा विचार करुन ठेवा. म्हणजे तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर देणे सोपे पडेल.

# टीममध्ये काम करताना...

**ऑफिसमध्ये आपण कायम टीममध्ये काम करत असतो. सगळ्यांनी मिळून एकत्र काम करणं, सर्वांना सोबत घेऊन काम करणं, हीसुद्धा अत्यंत कौशल्याची गोष्ट आहे. त्यामुळे टीममध्ये काम करताना ही दशसूत्री लक्षात ठेवायलाच हवी.**



» चोख काम : मी माझे काम चोख करेन. इतरांच्या कामाशी मला काही देणंघेणं नाही, अशी वृत्ती असून चालत नाही. अन्य सहकाऱ्यांबरोबर एकत्रितपणे काम करण्याची कला अवगत करून घ्यायला हवी. टीममध्ये राहून आपले वेगळेपण टिकविणे हेही एक कौशल्य आहे. सकारात्मक दृष्टी गरजेची आहे. अन्य सहकाऱ्यांबद्दल सतत नकारात्मक भावना ठेऊन चालणार नाही. सतत दोषदिग्दर्शन करणे योग्य नाही.

» व्यक्त व्हा : कामाबाबत, प्रोजेक्टबाबत, निर्णय घेण्याबाबत तुमचं मत विचारल्यास ते जरूर नोंदवा. बॉस म्हणतील तसे, कंपनीच्या धोरणानुसार, टीम काय म्हणते बघू, क्लाएंटचाही विचार करू, अशा प्रकारची वक्तव्ये करून स्वतःचे मत दडपून ठेऊ नका. मात्र, आपले मत संयतपणे मांडा. उद्धटपणा आणि आक्रमकपणा यांमधील सीमारेषा धूसर आहे, हे लक्षात ठेवा. आपले म्हणणे अतिशय प्रभावीपणे लिहूनही द्या. त्यावर टीममधील सहकाऱ्यांचा प्रतिसाद कसा असतो, याचेही निरीक्षण करा.

» खोटे बोलू नका : खोटे बोलण्याचा सर्वांत मोठा तोटा म्हणजे काय बोललो हे लक्षात ठेवावे लागते. त्यामुळे या भानगडीत पडूच नका.

» ऐकायची सवय करा : बोलणे जितके महत्त्वाचे, तितकेच ऐकणेही महत्त्वाचे. एखाद्या प्रकल्पाबाबत आपले टीम मेंबर काय म्हणतात हे जाणून घ्या. कुणाचे बोलणे अर्धवट तोडून तुमची प्रतिक्रिया देऊ नका. ते शांतपणे ऐका. त्यावरील प्रतिक्रियाही तितक्याच शांतपणे नमूद करा. मतभिन्नता असेल, तर ते स्पष्ट करा. समोरच्यांचे मत ऐकून आपले मत (जर आपण त्यावर ठाम असू, तर) बदलू नका. दुसरे लोक बोलत असताना मोबाइल, लॅपटॉप यांवर आपली कामे करू नका. मीटिंगच्या एटिकेट जरूर पाळा.

» संघर्ष टाळा : टीममध्ये काम करताना अन्य सहकाऱ्यांबरोबर मतभिन्नता निर्माण होण्यात गैर नाही. परस्परांच्या मतांचा, दृष्टिकोनांचा आदर करायला शिका. आपल्या मताचा आग्रह जरूर धरायला हवा; पण त्याचे रूपांतर हेकेखोरपणात होणार नाही, याची काळजी घ्या. आपलेच बरोबर; इतरांचे चूक, असा दृष्टिकोन नको. संघर्षाचे मुद्दे टाळून सर्वसहमतीच्या दिशेने कसे जाता येईल हे पाहा.

» यश साजरे करा : आपल्या एखाद्या सहकाऱ्याने कसल्याशा स्पर्धेत किंवा प्रकल्पात यश मिळविले असेल, तर ते साजरे करा. त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करा. मत्सर टाळा. तुमच्या यशाचा आनंदही जरूर व्यक्त करा. त्याबाबत अपराधभाव बाळगण्याची गरज नाही. इतरांना यश मिळाल्यास त्याचाही आनंद व्यक्त करा. सहकाऱ्याला अपयश आल्यास त्याला धीर द्या. बरे झाले; खोड मोडली, असं वक्तव्य त्याच्या मागेही करू नका. टीकात्मक बोलण्याचे टाळा.

» देहबोली : आपल्या भाषेप्रमाणेच आपल्या देहबोलीकडेही लक्ष द्या. समोरच्यांशी बोलताना त्यांच्याकडे पाहून बोला. इतरत्र बघून बोलण्याची किंवा खाली पाहून बोलण्याची सवय सोडून द्या. इतरांचे ऐकत असताना त्यांच्याकडे पाहून ऐका. बोलताना आणि ऐकताना आपले सर्व लक्ष बैठकीमध्येच ठेवा. बसतानाही शिष्टसंमत पद्धतीने बसा. पाय लांबवून बसू नका. महत्त्वाची बैठक चालू असताना आळस देऊ नका, बोटे मोडू नका, दात, कान कोरू नका. आपली वेशभूषा व्यवस्थित आहे, याची खात्री करा. चेहरा हसतमुख ठेवा.

» स्वतःवर नियंत्रण ठेवा : राग येणे, संतप्त होणे ही नैसर्गिक गोष्ट आहे. मात्र, रागावर नियंत्रण ठेवता आले पाहिजे. क्रोधाने माणूस संमोहित होतो आणि त्यामुळे समोर कोण आहे हेच तो विसरतो आणि परिणामी वाट्टेल ते बरळतो. यामुळे बुद्धिनाश होतो. हे टाळण्यासाठी स्वतःवर, रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

» अंतर्मुख व्हा : आपल्या प्रत्येक कृतीबाबत आपण अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. आपले काय चुकत तर नाही ना, हा प्रश्न आपल्या जवळच्यांना म्हणजे आई-वडील, भाऊ-बहीण, मित्र, जवळचे सहकारी यांना सतत विचारा. चूक होत असेल, तर ती मान्य करून दुरुस्त करा. इतरांच्या चुकांना क्षमाही करा.

» शिकत राहा : एकदा का पदवी घेतली की शिक्षणाचा आणि आपला संबंध संपला, असं नाही. उलट खरे शिक्षण त्याच्यानंतरच सुरू होतं. पाठ्यपुस्तकाबाहेरील पुस्तके मिळवून वाचा. विषयातील जाणकारांशी मैत्री करा. त्यांच्याकडून शिका. आपल्या क्षेत्रात नवीन काय चालले आहे, याची माहिती घेत चला. जोडीला एखादी नवीन भाषा शिकता येत असेल, तर ती शिका. अवांतर वाचन वाढवा. जनरल नॉलेजही अपडेट ठेवा.

# करिअर यशोशिखरावर नेणाऱ्या टिप्स!

**महाविद्यालयीन शिक्षण घेताना करिअरसाठी योग्य क्षेत्र निवडणे हा प्रत्येकासाठी कठीण निर्णय ठरतो. कोणत्या क्षेत्रात जावे, कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, कोणता कोर्स करणे त्यांच्यासाठी चांगले असेल, जेणेकरून त्यांना चांगली नोकरी मिळेल याचा विचार सतत येत असतो. असा गोंधळ टाळण्यासाठी करिअर निवडताना काही गोष्टी जाणून घेणे गरजेचे आहे. या गोष्टी लक्षात ठेवून तुम्ही करिअरची योग्य निवड करू शकाल आणि तुम्हाला यश मिळेल.**

» आपल्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करा : करिअर निवडण्याच्या बाबतीत कोणीही येऊन आपल्याला सल्ला देत असतात. पण उमेदवारांनी यापासून दूर राहावे. या गोष्टी करिअरच्या निवडीमध्ये अडथळा आणू शकतात. केवळ तज्ज्ञांचे मार्गदर्शन आपल्याला उपयोगी पडेल. याशिवाय स्वतःची योग्यता, क्षमता आणि आवड लक्षात घेऊन करिअरचा पर्याय निवडा.

» तज्ज्ञांशी बोला : करिअर निवडण्यापूर्वी तज्ज्ञाची मदत घ्या. त्यांच्याशी बोलल्याने तुम्हाला वस्तुस्थितीची माहिती मिळेल आणि भविष्यात याचा फायदा होईल. यामुळे मनात येणारे सर्व प्रश्न सुटतील आणि क्षेत्र निवडीतील अडचणी टाळता येतील आणि त्याचबरोबर स्पष्ट ध्येय घेऊन पुढे जाता येईल.

» व्यक्तिमत्वात ही कौशल्ये विकसित करा : करिअर करताना तुमचे व्यक्तिमत्त्व खूप महत्त्वाची भूमिका बजावते. अभ्यासानंतर एका पातळीवर येताना, व्यक्तिमत्वातील सर्जनशील विचार, निर्णय घेण्याची क्षमता, सकारात्मकता, संवाद कौशल्य, गोष्टी समजून घेण्याची कला इ. ही कौशल्ये महत्वाची भूमिका बजावतात. करिअर निवडण्यासाठी आणि यश मिळविण्यासाठी हे आवश्यक आहेत.

» मानसिक तयारी करा : करिअर निवडताना तुमचा निर्णय आणि आवड याबाबत पूर्णपणे तटस्थ राहा. स्वतःची मानसिक तयारी करा. अभ्यासक्रम किंवा क्षेत्र निवडीसाठी घेतलेला निर्णय पुन्हा पुन्हा बदलू नका. करिअरचा निर्णय विचारपूर्वक घ्या. यामुळे वेळ आणि ऊर्जा दोन्ही वाया जाण्यापासून वाचेल.

» पडताळणी करा : आगामी काळात कोणते क्षेत्र अधिक चांगल्या संधी देऊ शकते याची तपासणी करा. भविष्यात पैसा आणि छंद दोन्ही पूर्ण करता येतील, असे करिअर ऑप्शन पाहा. संबंधित क्षेत्रात जे काम करत आहेत त्यांच्याशी बोला.

» अनुभवी लोकांशी संपर्क साधा : तुम्ही ज्या क्षेत्रात कोर्स करत आहात त्या क्षेत्रातील लोकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करा. यातून अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती मिळते. दुसरीकडे, अनुभवी लोकांकडून करिअरसाठी चांगले मार्गदर्शन मिळेल. असे लोक भविष्यातही मदत करू शकतात.

» आत्मविश्वास वाढवा : आत्मविश्वास ही यशाची पहिली पायरी आहे असे म्हणतात. तुमचा आत्मविश्वास बरोबर नसेल, तर तुमच्याकडे कितीही माहिती असली तरी उमेदवार नोकरीत चांगली कामगिरी करू शकणार नाही. त्यामुळे आत्मविश्वास मजबूत ठेवा, त्याचा फायदा नोकरीत नक्कीच होतो.

# खोटी जॉब ऑफर ओळखायची कशी?

**आपल्याला बऱ्याचदा ईमेलवर जॉब ऑफर आलेली पाहून आनंद होतो. यामध्ये आपल्याला चांगले पद आणि पगाराची नोकरी ऑफर झालेली असते. पण या आनंदाच्या भरात आपण त्या ईमेल आणि जॉब ऑफरची सत्यता तपासत नाही. कोणतीही मुलाखत न घेता आकर्षक पगाराच्या पॅकेजसह ऑनलाइन जॉब ऑफर येत असेल तर ही सायबर फसवणूक असू शकते.**

सध्याच्या युगात नोकरी शोधणे सोपे झाले आहे पण नोकरी खरी की खोटी ओळखणे? हे फार कठीण झाले आहे. नोकऱ्यांसाठी अशा अनेक साइट्स आहेत, जिथे फक्त रेझ्युमे, तुमचे वैयक्तिक आणि व्यावसायिक तपशील अपलोड करून जॉब ऑफर येऊ लागतात. पण ते सर्व बरोबर आहेत की नाही? याबाबतची शंका कायम असते. सायबर क्राईम पोलिसांत यासंदर्भातील अनेक फसवणुकीच्या तक्रारी येत असतात. त्यामुळे खोट्या जॉबच्या ऑफर कशा ओळखायच्या? त्यातून कसं स्वतःला वाचवायचं? याचा तपशील जाणून घेऊया...



## फसवणूक कशी होते?

- तुमच्याकडे कामाचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसेल आणि तरीही तुम्हाला मोठे प्रोफाइल आणि पगाराची ऑफर येत असेल तर संशय निर्माण होण्यासारखी स्थिती आहे.
- जर तुम्हाला स्पॅम ई-मेलद्वारे नोकरीची ऑफर आली असेल तर वेळीच सतर्क होणे आवश्यक आहे. त्यावेळी तुम्ही सतर्क राहणे आवश्यक आहे. असे ऑफर लेटर कधीही स्वीकारू नका. त्यावर क्लिक करण्याचीही गरज नाही.
- अनेक वेळा बनावट वेबसाईटच्या माध्यमातून नोकरीची जाहिरात केली जाते. कुठेही अर्ज करण्यापूर्वी किंवा ऑफर लेटर स्वीकारण्यापूर्वी ती वेबसाइट नीट तपासा.
- उमेदवारांना चांगल्या पदाचे आणि जास्त पगाराच्या पॅकेजचे आमिष दाखवून त्या बदल्यात पैशांची मागणी केल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले आहे.
- अनेकदा राज्य किंवा देशाबाहेरील नंबरहून नोकरीसाठी फोन येतात. नोकरीसाठी पैसे भरण्यास सांगितले जातात. त्या नंबरवर पुन्हा फोन लागत नाहीत. अशावेळी सतर्क राहणे आवश्यक आहे.

## ऑफरची सत्यता कशी तपासायची?

- ऑफर लेटरमध्ये नोकरीच्या भूमिकेशी संबंधित माहिती नीटपण वाचून घ्या. त्यात काही अटी असतील तर समजून घ्या अन्यथा चुकूनही त्यावर सही करू नका.
- कंपनीचा लोगो, नाव आणि इतर तपशील नीट तपासा. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर देखील त्याची क्रॉस चेक करा. तुमच्या ओळखीत तिथे कोणी नोकरी केली का? ते पाहा. केली असेल तर त्यांच्याकडून माहिती घ्या.
- ऑफर लेटर तुम्हाला अधिकृत ईमेल आयडीद्वारे पाठवले गेले आहे की नाही ते तपासा. अनेकदा आयडी अधिकृत दिसत असला तरी प्रत्यक्षात तो फेक असतो.
- कंपनीचे अधिकृत सोशल मीडिया प्रोफाइल तपासा. गुगलवर कंपनीबद्दलचे रिव्ह्यू तपासा. यातून तुम्हाला बरीचशी माहिती मिळेल.

# ‘असे’ हटके उत्तर दिल्यास नोकरी पक्की!

- पुढच्या ५ वर्षांचे करिअर प्लानिंग : जर तुम्हाला मुलाखतीत विचारले गेले की तुम्ही पुढील ५ किंवा १० वर्षांत स्वतःला कुठे पाहता? तर तुम्हाला तुमचे खरे स्वप्न सांगण्याची गरज नाही. पुढच्या ५ वर्षांत मी स्वतःला या कंपनीत किंवा सेक्टरमध्ये चांगल्या पदावर काम करताना पाहतोय असे म्हणता येईल.
- आधीची नोकरी का सोडताय? : हा मुलाखतीत विचारला जाणारा सर्वात सामान्य प्रश्न आहे. तुम्ही जुन्या नोकरीमुळे नाराज आहात किंवा पगारासाठी नवीन नोकरी शोधत आहात, यापैकी कोणते तुमचे कारण असले तरी असे सांगू नका. तुम्हाला नवीन आव्हानांसोबत काम करायचे आहे, असे उत्तर देखील देऊ शकता.
- आधीच्या बॉसबद्दल वाईट सांगू शकता का? : मुलाखतीत तुमच्या सध्याच्या कंपनीच्या बॉसबद्दल वाईट बोलणे टाळा. मुलाखत पॅनेलमध्ये उपस्थित असलेले लोक तुम्हाला आधीच ओळखत असतील किंवा तुमच्या स्थितीची कल्पना असेल तर ती वेगळी बाब आहे. पण तरीही, सध्याच्या कंपनीच्या बॉस, कर्मचारी किंवा वर्क कल्चरबद्दल वाइट सांगू नका. अन्यथा नवीन कंपनीतील बॉस तुम्हाला नोकरी देताना विचार करेल.
- तुमचा छंद कोणता आहे? : प्रत्येक व्यक्तीला काही ना काही छंद नक्कीच असतो पण नोकरीच्या मुलाखतीदरम्यान तुमचा छंद कोणता हा प्रश्न देखील हमखास विचारतात. तुम्हाला रात्रंदिवस चित्रपट किंवा वेब सिरीज पाहण्याची आवड असेल किंवा तुम्हाला सोशल मीडियाचे व्यसन असेल तर तुम्हाला ही गोष्ट मुलाखतीत सांगण्याची गरज नाही. यामध्ये समोरची व्यक्ती तुम्हाला आळशी समजू शकते. याऐवजी तुमच्या कामासंबंधीत गोष्टींपैकी आवडीची गोष्ट सांगू शकता.

# अहमदाबाद : विमानातून ४.२६ कोटींचे सोने जप्त



**गुजरात (वृत्तसंस्था)**– गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. तब्बल ४.२६ कोटी रुपयांचे विदेशी सोने जप्त करण्यात आले आहे. दुबईहून अहमदाबाद येथे आलेल्या इंडिगोच्या ६ए-१४७८ या विमानात हे सोने चतुराईने लपवले होते.

सीमाशुल्क (कस्टम्स) अधिकाऱ्यांनी शनिवार १३ जून २०२६ रोजी विमानाची सखोल तपासणी केली. यावेळी विमानातील सहकारी कर्मचाऱ्यांच्या मदतीने विमानाच्या पुढील शौचालयातील स्पीकर बॉक्सची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये काळ्या प्लास्टिक टेपने गुंडाळलेले दोन संशयास्पद पाऊच आढळून आले. या पाऊचची तपासणी केली असता त्यामध्ये ९९९.० शुद्धतेची (२४ कॅरट) एकूण २४ विदेशी सोन्याची बिस्किटे सापडली. या सोन्याचे एकूण वजन २,७९९.३ ग्रॅम असून त्याचे बाजारमूल्य चार कोटी २६ लाख ८९ हजार ३२५ रुपये इतके असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सीमाशुल्क विभागाच्या प्राथमिक तपासणीत हे सोने भारतात बेकायदेशीररीत्या आणण्याच्या उद्देशाने विमानात लपवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, जप्त करण्यात आलेल्या सोन्यावर मालकी हक्क सांगण्यासाठी कोणतीही व्यक्ती पुढे आली नाही. त्यामुळे सीमाशुल्क कायदा १९६२ अंतर्गत संबंधित नियमांनुसार, सर्व सोने जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू असून तस्करीमागील व्यक्ती किंवा रॅकेटचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती सीमाशुल्क विभागाने दिली. सीमाशुल्क विभागाने या कारवाईचा व्हिडीओही प्रसिद्ध केला असून, विमानतळांमार्फत होणाऱ्या सोन्याच्या तस्करीवर लक्ष ठेवण्यासाठी तपास यंत्रणा अधिक सतर्क झाल्याचे दिसून येत आहे.


## टी.सी. हरवली

माझी कु. अनिता किशन तोटरे या नावाची वर्ग ५ पाचवी टी.सी. मुखेड ते जाहुर बसने प्रवास करतांना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

**– संपर्क –**
**मोबाईल नंबर**
**९१५६७८२४५९**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## Change In Name

My old Name is **DARKASHA ANJUM FAZAL AHMED** Which now I am Changing as New Name **DARKASHA ANJUM SYED ZAKIRHUZEN.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: ASRA NAGAR, NEAR AIRPORT ROAD, SANGAVI BK, NANDED-431605 Mob: 7588424786

**तहसिलदार तथा दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात**
**प्रकरण- जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत**
**अर्ज क्र.709/2026**
**जाहिर प्रगटन**

विषयः- जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आणि जन्म व मृत्यू नोंदणी 1969 चे कलम 13 (3) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहिर प्रगटन.

संदर्भ- अर्जदार श्री.भास्कर दादाराव शिंदे रा.नरसी ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि.25/05/2026

ज्याअर्थी श्री.भास्कर दादाराव शिंदे रा.नरसी ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि.25/05/2026 अर्जदार यांचा मुलगा श्रीनिवास भास्कर शिंदे यांचा जन्म दिनांक.26/08/2009 रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय नरसी ता.नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू दाखल्याचा मागणी अर्ज दिला असता संबधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत नरसी ता.नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम 1969 च्या कलम 11 अन्वये नमुना 10 (अ) व 10 (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि.21/05/2026 रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम 2023 (सुधारीत) आणि कलम 13 (3) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम 1969 अन्वये अर्जदार यांचा मुलगा श्रीनिवास भास्कर शिंदे यांचा जन्म दिनांक.26/08/2009 जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय नरसी ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांनी जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनूषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका/दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा. अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक 05/06/2026 रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

तहसिलदार नायगांव (खै.) तथा
तालुका दंडाधिकारी नायगांव (खै.)

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३४५

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०१ मालमत्ता क्र. १५४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सतीष बापुराव सोमशेटवार रा. गणेश चौक मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १५४ वार्ड नं. ०१ बापुराव विश्वनाथ सोमशेटवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ----/---- दि. ०२/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – देणार यांची जागा, पश्चिमेस – रस्ता, दक्षिणेस – बालाजी जुन्नावार यांचे घर, उत्तरेस – बोळ.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

**जाहीर पत्रक**
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३४४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ११८/१/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, कालिदास हरि बंडे रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ११८/१/२ वार्ड नं. १७ रामेश्वर विठ्ठल बंडे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ----/---- दि. ०८/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – चिकलपल्ले, पश्चिमेस – कालिदास हरि बंडे, दक्षिणेस – रस्ता, उत्तरेस – प्लॉट नं. रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, मुखेड यांचे न्यायालयात

ज्याअर्थी अर्जदार नामे तूळशीराम संग्राम गूटे रा. सावरगाववाडी यांचे जन्माची दिनांक १३/०५/१९७४ मौ. सावरगाववाडी ता. मुखेड जि. नांदेड येथे जन्म झाला असून सदर जन्म नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता निबंधक जन्म मृत्यू निबंधक ग्रामविकास अधिकारी सावरगाववाडी यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, तूळशीराम संग्राम गूटे रा. सावरगाववाडी यांचे जन्माची दिनांक १३/०५/१९७४ मौ. सावरगाववाडी ता. मुखेड जि. नांदेड येथे उपलब्ध नाही, त्याअर्थी या जाहीर प्रगटना द्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, तूळशीराम संग्राम गूटे रा.सावरगाववाडी यांचे जन्माची दिनांक १३/०५/१९७४ मौ. सावरगाववाडी ता. मुखेड जि. नांदेड रोजी नोंद घेण्याविषयी कोणाची काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांमध्ये संबंधित मंडळ अधिकारी अथवा या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**तालुका दंडाधिकारी, मुखेड**

## जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, हदगाव यांचे न्यायालयात जन्म – मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२४ मध्ये कलम ११ (२) प (३) त्पन्वयै अर्ग क्र. १९

**श्री. भगवान नारायण मोहिते**
**विरुद्ध**
**जन्म – मृत्यू नोंदणी निबंधक तथा मुख्याधिकारी न.प. हदगाव**
**विषय :– जन्म – मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये**

ओमकार भगवान मोहिते, यांची जन्माची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत.

ज्या अथी अर्जदार **श्री. भगवान नारायण मोहिते रा. गारगव्हाण ता. हदगाव जि. नांदेड** वय वर्ष यांनी **ओमकार भगवान मोहिते** याचा दि.१६.११.२००९ रोजी **गारगव्हाण** येथे जन्म झाला असून सदर जन्म-मृत्यू नोंद नोंदणी सुधारणा कायदा २०२४ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरीता जन्म-मृत्यू नोंदणी निबधंक तथा ग्रामपंचायत अधिकारी, **गारगव्हाण** ता. हदगाव जि. नांदेड यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्या अर्थी **ओमकार भगवान मोहिते** यांची जन्माची नोंद **जन्म-मृत्यू नोंदणी निबबंक तथा ग्रामपंचायत अधिकारी, गारगव्हाण ता. हदगाव जि. नांदेड** येथे उपलब्ध नाही.

त्या अर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या दि.१६.११.२००९ रोजीची जन्माची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून १५ दिवसामध्ये या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजरी न केल्यास सदरच्या अर्जावर गुणवत्तेनुसार आदेश पारीत करण्यात येईल.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी, हदगाव**

## Change In Name

My old Name is **SAIYAD JAKIRHUSEN ABDUL JABAR** Which now I am Changing as New Name **SYED JAKIRHUSEN ABDUL JABBAR**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: ASRA NAGAR, NEAR AIRPORT ROAD, NANDED - 431605 Mob: 7588424786

# सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पतसंस्था, म. नांदेड

रजि.नं. एन.एन.डी./एन.एन.डी./डी.एन.के./अ २१३/८७
सहेलसिंघ मार्केट, गुरूद्वारा चौरस्ता, नांदेड– ४३१६०१

## :: पाहिजेत ::

संस्थेच्या कार्यासाठी मानधन करार तत्वावर खालील पद भरणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या | शैक्षणिक पात्रता/अनुभव |
|---|---|---|---|
| ०१ | Manager (व्यवस्थापक) | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी, पदव्युत्तर उत्तीर्ण, २. पतसंस्था/बँकिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव ३. MSCIT/DTP/TYPING (ENG.MAR) इत्यादी कामाचा अनुभव |
| ०२ | Accountant (लेखापान) | ०१ | १. १२ वी उत्तीर्ण, २. पतसंस्था बँकिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव. ३. MSCIT/DTP/TYPING (ENG.MAR) इत्यादी कामाचा अनुभव. |

वरील करारतत्वातील पदाचा नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन दि २२/०६/२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज सचिव, सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेड सहेलसिंघ मार्केट, गुरुद्वारा चौरस्ता, नांदेड येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ११ ते सांयकाळी ७ वाजे पर्यंत पाठवावे,

ई–मेलद्वारे पाठविलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अर्जा सोबत बायोडाटा, शैक्षणिक पात्रता, वय, अनुभव या बाबिशी संबधीत आवश्यक ती कागदपत्रे सांक्षाकित करुन संस्थेच्या कार्यालयात जमा करावे. अर्जावर पासपोर्ट आकाराचा स्व स्वाक्षरी केलेला फोटो चिकटवावा, विहित दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सर्व इच्छुक उमेदवारांनी पात्र उमेदवाराची मुलाखात घेऊन निवड करण्यात येईल.

जाहिराती मध्ये नमुद केलेली पद आवश्यकतेनुसार भरण्याचा/ बदलण्याचा, तसेच पद भरती प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार सचिव सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेड यांना राहतील.

स्वाक्षरीत/-
सचिव
**सचखंड बोर्ड कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेड**

Mahatma Gandhi Mission's

# COLLEGE OF COMPUTER SCIENCE & IT,

**MGM** Campus, Near Airport, NANDED 431605
(Affiliated to S.R.T.M. University, Nanded, Maharashtra)

## ADMISSION NOTICE

**UG COURSES**
- B.Sc. CS / (BCS)
- B. C. A.
- B.Sc. Biotechnology
- B.Sc. Bioinformatics

**PG COURSES**
- M.Sc. SE /(MCS)
- M.Sc. Electronics
- M.Sc. Biotechnology
- M.Sc. Bioinformatics

**Link for Registration**
**https://forms.gle/zP5sVxtJ3SzmMrV27**

For BCA, Admission through MAH-CET and registration against institutional quota
**Last date for registration : 18th June 2026**
(Admission as per merit/ Reservation as per norms) **Principal**

**Contact : 9881961903, 9960204482, 9421454254, 9966656602, 9158677555**

# जवाहर विद्यार्थी मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह

बरबडा ता. नायगांव जि. नांदेड

## प्रवेश देणे चालू आहे

**शैक्षणिक वर्ष-२०२६-२७ मध्ये इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.**

| अ.क्र | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अनूसूचित जाती | ६७ टक्के |
| २. | अनुसूचित जमाती | १४ टक्के |
| ३. | विमुक्त भटक्या जमाती | १५ टक्के |
| ४. | विशेष मागासवर्ग | ०२ टक्के |
| ५. | इतर मागासवर्गीय जाती | १५ टक्के |
| ६. | बिगर मागासवर्ग जाती | ०५ टक्के |

**आमचे वैशिष्टये :-**

१.भव्य व सुसज्ज इमारत
२.मोफत निवास व जेवणाची उत्तम सोय
३. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी तज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन
४. विविध खेळासाठी प्रशस्त भव्य क्रीडागंण
५. वॉटर फिल्टरची सुविधा
६. प्रशस्त हवेशीर खोल्यांची व्यवस्था आणि नळाद्वारे व बोअरद्वारे पाणी तसेच लाईट व पंख्याची सोय, लाईट गेल्यास युनीटरची सोय.

नोट :-वरीलप्रमाणे प्रवेश देण्याची जागा मर्यादित आहे. तरी गरजू पालकांनी आपल्या मुलांचा प्रवेश लवकरात लवकर घ्यावा.

अधिक्षक/संचालक
जवाहर विद्यार्थी मागासवगीय मुलांचे वसतिगृह
बरबडा ता. नायगांव जि. नांदेड

# कार्यालय
# जिल्हा वक्फ अधिकारी,नांदेड

पत्ता:-मस्जिद जुनी ईदगाह,गांधी पुतळयाजवळ,नांदेड-431601

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्र:02462-299331 | ई-मेल: dwonanded@mahawakf.com |
| क्रमांक.जिवअ/नांदेड/चौकशी-1/322/2026 | दिनांक: 11/06/2026 |

संचिका क्र.69/79/2026

(जाहीर प्रगटन)

[illegible]द अधिनियम १९९५च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजुर करणेबाबत.

वक्फ संस्थेचे नाव :- दर्गा यतीम शहा मिया आशुरखाना आणि कब्रस्तान पत्ता.चौक,नांदेड

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार अमन खान गौस खान खादरी व इतर(४)लोकांनी या कार्यालयात योजना गठीत करण्यासाठी दिनांक ०१/०६/२०२६रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापणाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे .प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ(०५)वर्षाचा असुन व्यवस्थापण समिती निवडीची रित निवडणुकीव्दारे अशी आहे. योजनेमध्ये नमुद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | नाव | पद |
|---|---|---|
| १) | अमन खान गौस खान खादरी | अध्यक्ष |
| २) | एजाज बिन ईसाक अवलखी | उपाध्यक्ष |
| ३) | उस्मान खान गौस खान | सचिव |
| ४) | शेख परवेज शादुल | खजिनदार |
| ५) | महंमद अनवर महंमद गौस | सदस्य |
| ६) | शेख खाजा मोईनोद्दीन पिता शेख अजीमोद्दीन | सदस्य |
| ७) | करीम खान गौस खान | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी,आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन(०८)दिवसाच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय,नांदेड पत्ता.मस्जिद जुनी ईदगाह, नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरुपात सादर करावे.विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

(मो.मोतासीम अन्सारी)
जिल्हा वक्फ अधिकारी,
नांदेड

पंजीयन.क्र.एन.एन.डी /बी.एन.के. / ११५-७४../ दिनांक १०.०६.१९७४

# वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.नांदेड

Email ID: socetyveejkamgar@yahoo.in मो.न.(७८७५९६४२२२)
व्ही.आय.पी.रोड महादेव दालमील च्या बाजूला नवीन मोढा नांदेड .

| सतिश आनंदराव वाघमारे | कैलास नरहरी राऊत | रमेश गोविंदराव वडगावे |
|---|---|---|
| (मानदसचिव) | (उपाध्यक्ष) | (अध्यक्ष) |

जा.क्र./ वीकासो /२०२६-२७/ दिनांक :- १२/०६/२०२६

## लघु निविदा

संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षासाठी अहवाल छपाई साठी सर्व नामांकित मुदांकाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

इच्छुकांनी दि.२३/०६/२०२६ पर्यंत दरपत्रके संस्थेंच्या कार्यालयात दाखल करावी या निविदेचा तपशील नियम व अटी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

## नियम व अटी

संस्थेचा सन २०२५-२०२६ या वर्षासाठी अहवाल छपाई पुस्तिका छापावयाची आहे त्यासाठी छपाई दाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहिती व अटी खालील प्रमाणे राहतील.

१) अहवाल पुस्तिका एकूण (५२) पेजेस ची राहील त्यापैकी (३६) पेजेस साधे व (१६) पेजेस आर्ट पेपर राहतील.
२) अहवाल पुस्तिका एकूण २००० (अक्षरी दोन हजार आठशे पन्नास फक्त) राहिल व फोटो पुस्तिकेचा दर देण्यात यावा
३) साईज - ७९.०५ इंच
४) डिझाईनिंग - सर्व पेज डिझायनिंग व क्रिएटिव वर्क आणि प्रुफिंग
५) मुख्यपृष्ठ - आर्ट कार्ड ३०० जी.सी.एम. एक बाजू ग्लास लॅमिनेशन
६) आतील पान - पांढरे व ८० जी.सी.एम. मॅफलितो डबल कलर
७) ईनर - आतिल छपाई १३० जी.सी.एम. आर्ट पेपरवर
८) बाईडिंग - सेंटर पिनिग.
९) ऑर्डर मिळाल्यापासून (५) दिवसात अहवाल छापून द्यावे लागतील जर या व्यतिरिक्त पेजेस वाढविलयास अथवा कमी झाल्यास त्यासाठी आर्ट पेपर साधा पेपर दर नमूद केल्याप्रमाणे पेपरचा दर हा प्रत्येक हजारासाठी देण्यात यावा.
१०) निविदेतील दर सर्व प्रकारचे करा सहित राहावेत.

**मानदसचिव**
**वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेड .**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# नांदेड एक्साईज विभागाची कारवाई; ९ लाख तीन हजारांचा मुद्देमाल जप्त, ३३ आरोपींना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** पुणे-फुगेवाडी येथे मिथेनॉल मिश्रित दारू सेवनामुळे झालेल्या दुर्घटनेनंतर नांदेड एक्साईज विभागाने जिल्ह्यात ९ जून ते १३ जून दरम्यान तब्बल ३३ गुन्हे दाखल करून ३२ आरोपींना अटक केली. एवढेच नाही तर हातभट्टी, देशी, विदेशी, रसायन, ताडी असा ९ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पुणे-फुगेवाड़ी मिथेनॉल मिश्रित हातभट्टी दारू सेवन दुर्घटनेच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ९ जून २०२६ ते १३ जून २०२६ पर्यंत ३३ कारवाया केल्या.

सदर मोहीम राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उप-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क नांदेड डॉ. बी. एच. तडवी यांनी दिलेल्या सुचनेनुसार अधीक्षक एस. एल. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील कार्यकारी निरीक्षक, दु.निरीक्षक व भरारी पथक यांनी दि. ९ जून २०२६ ते १३ जून २०२६ रोजी एकूण ३३ कारवाया केल्या आहेत.



मोहिमेदरम्यान दोन हजार ५१५ लिटर रसायन, ८४.९८ लिटर देशी दारू, ८१.१० लिटर विदेशी, १, ८७६ लिटर ताडी आणि ३४० लिटर हातभट्टी दारु असा मुद्देमाल जप्त करून ३२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यावेळी तीन वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. यासोबतच मुखेड येथील निरीक्षक व दुय्यम निरीक्षक अमोल शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ६३. ७६ लीटर गोवा राज्य निर्मित हायलँड ब्रँडचे ७५० मिलि क्षमतेचे सहा बॉटल्स, विदेशी मद्याच्या रिकाम्या बाटल्या, लेबल, बुच, २०. ८२ एक लिटर क्षमतेचे तीन बॉटल, बनावट देशी दारू ९८, विदेशी दारू ३८४, देशी दारू, रिकाम्या बाटल्या, मद्य भेसळ करणारे इतर साहित्य एक दुचाकी व चारचाकी अशा वाहनांसह ७ लाख २० हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ९३ अंतर्गत एकूण ३९ प्रकरणे नोंद करण्यात आली असून यापूर्वी ज्या आरोपींनी चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र लिहून दिलेले आहे. त्या सराईत गुन्हेगारांपैकी ६ गुन्हेगारांनी बंधपत्राचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेवर हद्दपार करण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच एमपीडी प्रस्ताव दाखल करून त्याची रवानगी थेट कारागृहात करण्यात येईल. त्या कारवाईचा भाग म्हणून दिनांक ५ जून २०२६ रोजी एका सराईत गुन्हेगारास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या आदेशाने एमपीडी अंतर्गत कारवाई करून त्याची रवानगी थेट कारागृहात करण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये अधीक्षक एस. एल. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जावेद कुरेशी, आशिष महिंद्रकर, लक्ष्मण पाटील, सरकाळे, दुय्यम निरीक्षक सचिन शेटे, अमित वालेकर, रामप्रसाद पवार, अमित आढळकर, सुमित चव्हाण, संदीप देशमुख, श्रीमंत बोरुडे, अमोल शिंदे, सहायक दुय्यम निरीक्षक बालाजी पवार, अशीलता कदम, रेणुका सलगर, मोनिका पाटील यांच्यासोबतच भरारी पथकातील रमेश राठोड, एकनाथ फडणवीस आदींनी सहभाग घेतला होता.

# बाफना रोड परिसरात तीन दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी

**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील बाफना परिसरात टिनशेडमध्ये असलेली ३ दुकाने जळून खाक झाली. ही घटना शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास घडली. या आगीचे लोळ हवेत उंच उडत होते. यामुळे परिसरात काही वेळ नागरिकांची धावपळ उडाली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज अग्निशमन विभागाने व्यक्त केला आहे.



शहरातील बाफना परिसरात शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास या भागात टिनशेडमध्ये असलेल्या ३ दुकानांना अचानक आग लागली. आईल व प्लास्टीकच्या साहित्यामुळे काही वेळात या आगीचा भडका उडाला. आगीचे लोळ उंच हवेत उडत होते. यामुळे रस्त्यावरील नागरिकांसह व्यापाऱ्यांचीही काही वेळ धावपळ उडाली. ही माहिती मिळताच महापालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी अर्ध्या तासात ही आग आटोक्यात आणली. या आगीत मोहम्मद सिद्दीकी यांचे कार एसी रिपेरिंग, शेख हाफिस यांचे कार डेकोर रिपेरिंगचे साहित्य जळाले. तर मोहम्मद अमिनोदिन यांच्या दुकानातील बॅटरी चार्जर, सेंटर लॉक रिपेरिंग साहित्य जळाले. वजिराबाद पोलीस ठाण्यात जळीत प्रकरण नोंद करण्यात आले आहे.



**नांदेड** –अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्था जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने शंकरराव चव्हाण सभागृह येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय महासचिव ॲड. गजानन साटोटे, तुकाराम वानखेडे, पांडुरंग गलपवाड, नानासाहेब लखारे, डी. के. टोकलवाड, माजी जि. प. सदस्य चंद्रसेन पाटील, सविता डहे, हिम्मतराव मोरे, सचिन जमदाडे, सविता येलरवाड, गणपत पांडलवाड, एन. एस. बट्टेवाड, व्यंकट नागलवाड, गजानन तोकलवाड, प्रियंका अडगुलवार यांच्यासह विविध मच्छिमार सोसायटीचे चेअरमन उपस्थित होते. **(छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

# मनाठा ठाण्याच्या हद्दीत सापडलेल्या 'त्या' मृतदेहाची ओळख पटली; अनैतिक संबंधातून खून, दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** –मनाठा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडलेल्या 'त्या' मृतदेहाची ओळख पटली असून, अनैतिक संबंधातून हा खून झाल्याचे पोलीस सूत्रांनी कळविले आहे. या प्रकरणी दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

निमटोक पिंगळी रोडवरील शेतशिवारात बुधवार, दि. १० जून रोजी सायंकाळी सहाच्या दरम्यान अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक विलास चवळी हे आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले.

त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी डी. एस. हाके, हदगावचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी घटनास्थळ गाठून पुढील प्रक्रियेसाठी मृतदेह शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे पाठवून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गोपनीय माहितीनुसार सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून केलेल्या तपासात अवघ्या चोवीस तासात स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने मनाठा पोलिसांनी खुनाचा छडा लावत तीन पैकी दोन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात यश मिळवले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार मयत संतोष अंगद वाघ रा. पोखर्णी नृसिंह ता. जि.परभणी येथील रहिवासी होता. त्याला आरोपींनी फुस लावून निमटोक पिंगळी रोडवरील शेतशिवारात आणून खून केला. अनैतिक संबंधातून घडलेल्या घटनेतील आरोपी शंकर बिरगड रा.कुरुंदा ता.वसमत, जि. हिंगोली, विलास लक्ष्मण आवळे रा.टाकळी ता.उमरखेड जि. यवतमाळ या दोन आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले असून, तिसरा फरार आरोपी सुरज भजने रा. बरडशेवाळा ता. हदगांव याच्या शोधात मनाठा पोलीस आहेत. मयताच्या वडिलांच्या फिर्यादीवरून मनाठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आ. कोहळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे व साडी-चोळी वाटप

**तामसा (प्रतिनिधी)** –हदगाव- हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शिवसेना तामसा शाखेच्या वतीने सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी रुग्ण, प्रसूती महिला व त्यांच्या नातेवाईकांना साडी-चोळी, बिस्कीट पुडे तसेच फळांचे वाटप करण्यात आले.



या प्रसंगी तामसा महिला आघाडीच्या अध्यक्षा तन्वी मेहेत्रे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर विभुते, गटप्रमुख दिलीप कोथळकर, शरद दुगाळे, सोसायटी संचालक सूरज तवर, पत्रकार अरविंद हुंडेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी सूर्यवंशी, कर्मचारी अमोल चव्हाण यांच्यासह रुग्ण व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करत समाजोपयोगी उपक्रमांद्वारे वाढदिवस साजरा करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांना आवश्यक वस्तू व फळांचे वितरण करण्यात आल्याने रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांनी समाधान व्यक्त केले. कोणताही गाजावाजा न करता अत्यंत साध्या व सेवाभावी स्वरूपात हा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# धनेगाव/मुजामपेठ गृहनिर्माण संस्थेप्रकरणी गुन्हे दाखल होणार

## ♦ आ. बोंढारकर यांनी उपस्थित केला होता विधिमंडळात तारांकित प्रश्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराला लागून असलेल्या धनेगाव/मुजामपेठ येथील जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्यादित बळीरामपूर ही संस्था रद्द झाल्यानंतरही काही प्लॉटधारकांना स्वयंघोषित चेअरमन यांनी प्लॉट विक्री केले होते. यात अनेक गोरगरिबांची फसवणूक झाली. ते सध्या शासकीय कार्यालयात न्यायासाठी खेटे मारत आहेत. अखेर या प्रकरणात नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी नुकत्याच झालेल्या अधिवेशनादरम्यान तारांकित प्रश्न (क्रमांक ३६ ७० ८) उपस्थित केला. यामुळे सहकार व पणन विभागाच्या राज्याच्या कार्यासन अधिकारी शिल्पा पुरव यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून तातडीने अहवाल सादर करावा व संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करावे असे पत्र पुणे येथील सहकार आयुक्त व निबंधक यांना दिले. त्यामुळे या प्रकरणात तातडीने चौकशी होऊन फौजदारी गुन्हे दाखल होण्याच्या प्रक्रियेला आता वेग आला आहे.

जय हनुमान गृहनिर्माण संस्था ही सन २०१७ मध्ये रद्द झाली होती. त्यानंतरही काही स्वयंघोषित चेअरमन बनून बनावट कागदपत्र तयार करून काही लोकांना प्लॉटची विक्री केली. हे कायद्याला अभिप्रेत नसतानाही शासनाची आणि प्लॉटधारकांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर या भागातील काही नागरिकांनी दुय्यम निबंधक कार्यालय, जिल्हाधिकारी तसेच स्थानिक पोलीस ठाण्यातही दाद मागितली, परंतु त्यांना न्याय मिळाला नाही. अखेर या प्रकरणाची दखल या भागाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी घेतली आणि त्यांनी विधिमंडळात हा तारांकित प्रश्न उपस्थित केला. या प्रकरणात संबंधिताविरुद्ध तसेच देणार आणि घेणार यांच्यावरही फौजदारी गुन्हे दाखल होऊन फसवणूक झालेल्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

पान १ वरून...

## पंतप्रधान मोदींचा १२ वर्षांचा...

'ग्रीन ग्रोथ झोन'मध्ये झाले आहे. यासोबतच, राजपथचे 'कर्तव्य पथ' असे नामकरण, नवीन संसद भवनाची निर्मिती, 'सेंगोल'ची स्थापना, स्टॅच्यू ऑफ युनिटी आणि बाबासाहेबांच्या 'पंचतीर्थांचा' विकास करून मोदी सरकारने देशाचा सांस्कृतिक अभिमान नव्या उंचीवर नेला आहे. 'लस मैत्री'च्या माध्यमातून ९९ देशांना मदत करून भारताने जगाचा विश्वास जिंकला आहे.

जी-२० चे यशस्वी अध्यक्षपद आणि देशात आलेली ७० लाख कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक हा जागतिक विश्वासाचा पुरावा आहे. 'मॉर्मिंग कन्सल्ट'च्या आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणात ७५% पसंतीसह नरेंद्र मोदी हे जगातील सर्वात लोकप्रिय नेते ठरले असून त्यांना ३२ आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले आहेत, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचे खा. चव्हाण यांनी याप्रसंगी नमूद केले.

# 'नीट' पेपरफुटी व घोटाळ्याबाबत उद्या युवक काँग्रेसचा नांदेडमध्ये मशाल महामोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी) –** देशभरातील लाखो होतकरू विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा नांदेड शहर युवक काँग्रेसच्या वतीने सोमवार, दि. १५ जून रोजी मशाल महामोर्चा काढून निषेध करण्यात येणार आहे, अशी माहिती युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शंकर बाजीराव शिंदे यांनी दिली आहे.

मशाल मोर्चा युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष शिवराज मोरे, नांदेड जिल्ह्याचे विद्यमान खासदार तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. खा. रविंद्र वसंतराव चव्हाण, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, जिल्हाध्यक्ष नांदेड उत्तर डॉ. विठ्ठल पावडे, नांदेड शहर महानगराध्यक्ष अब्दुल गफारभाई यांच्या मार्गदर्शनाखाली निघणार आहे.

युवक काँग्रेसच्यावतीने हा मशाल मोर्चा शहरातील अहिल्याबाई होळकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणाहून निघून क्रांतीवीर महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पुतळ्याजवळ येऊन विसर्जित होणार आहे. तेव्हा युवक काँग्रेससह नांदेड जिल्हा काँग्रेसच्या सर्व विभागाचे आजी, माजी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच युवकांनी ह्या मशाल महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन युवक काँग्रेसच्यावतीने एका पत्रकान्वये करण्यात आले आहे.

# निवेदक विक्रम कदम यांना मातृशोक

**लोहा (प्रतिनिधी) –**



आंबेसांगवी (ता. लोहा) येथील ज्येष्ठ महिला वच्छलाबाई संतोबाराव कदम यांचे वृद्धापकाळाने उपचारा दरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. १४ जून रोजी दुपारी १ वाजता लोहा तालुक्यातील मौ. आंबेसांगवी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. प्रसिद्ध निवेदक विक्रम पाटील कदम यांच्या त्या मातोश्री होत.

# वि.प. निवडणुकीत नगरसेवकांच्या संशयास्पद अनुपस्थितीची चौकशी करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार असलेल्या अनेक नगरसेवकांच्या संशयास्पद अनुपस्थितीबाबत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत इंगोले यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पडावी यासाठी त्यांनी निवडणूक निरीक्षकांकडे लेखी निवेदन सादर करून संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.



प्रशांत इंगोले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नांदेड जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम उमेदवार निश्चित झाले आहेत. निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने त्यांनी नांदेड-वाघाळा महानगरपालिका तसेच जिल्ह्यातील विविध नगरपालिका व नगरपरिषदांमधील नगरसेवक तथा विधान परिषद मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र मोठ्या प्रमाणावर नगरसेवक उपलब्ध नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अनेक नगरसेवकांचे मोबाईल फोन बंद अथवा 'नॉट रिचेबल' असल्याचे आढळून आले असून, प्रत्यक्ष भेटीचे प्रयत्न करूनही संबंधित लोकप्रतिनिधी उपलब्ध झाले नसल्याचा दावा त्यांनी निवेदनात केला आहे. निवडणुकीच्या काळात मतदारांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे अपेक्षित असताना मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी संपर्काबाहेर असल्याने अनेक शंका निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

इंगोले यांनी म्हटले आहे की, हे नगरसेवक जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी असून त्यांच्यावर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या प्रश्नांबाबत नैतिक व वैधानिक जबाबदाऱ्या आहेत. अशा परिस्थितीत त्यांचा अचानक संपर्क तुटणे व सार्वजनिक जीवनातून दूर राहणे ही बाब गंभीर आणि चिंताजनक आहे.

मागील काही निवडणुकांमध्ये विविध प्रकारच्या राजकीय दबाव, प्रलोभने किंवा इतर माध्यमांचा वापर करून निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकल्याच्या चर्चा होत आल्याचा उल्लेख करत त्यांनी सध्याच्या परिस्थितीत काही मतदार नगरसेवकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध एका ठिकाणी ठेवण्यात आले आहे का, त्यांच्यावर कोणत्या प्रकारचा दबाव टाकला जात आहे का अथवा त्यांचे स्वातंत्र्य बाधित झाले आहे का, याबाबत निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे इंगोले यांनी म्हटले आहे.

# सचिन कपाळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–**



शहरातील लक्ष्मी नगर येथील रहिवासी तथा मंगल सांगवी ग्रामपंचायतचे सदस्य सचिन गुणाजी कपाळे यांचे शुक्रवार, दि. १२ जून रोजी रात्री १० च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी ते ४२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे. सचिन कपाळे यांच्या पार्थिव देहावर शहरातील गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्व. सचिन कपाळे यांचा मनमिळावू स्वभाव होता. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांनी मोठ्या प्रमाणात मित्र परिवार जमवला होता. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com